काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112
EYE Q MEDIA





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ११.१२.२०२४ | अंक नं. २३७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायन्सेस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB Financial Services | BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोऱ्या सुरुच

## गुन्हे दाखल होतात मात्र तपास लागेना; पोलिसांसमोर चोरांचे मोठे आव्हान

नगर - नगर शहर परिसरातून तसेच जिल्हाभरात सर्वत्रच मोटार सायकल चोरीला जाण्याचे सत्र सुरूच असून गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणाहून अनेक मोटारसायकल चोरीला गेल्या आहेत. या प्रकरणी शहरातील कोतवाली, तोफखाना या सह जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र या गुन्ह्यांचा तपास लागत नसल्याने या मोटारसायकल चोरांना पकडून या चोऱ्या रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

शहरातील व जिल्ह्यातील विविध भागातून या दुचाकी चोरीला जात आहेत. विशेष करून शासकीय कार्यालये, दवाखाने, हॉटेल्स यांच्या पार्किंग मधून दुचाक्या चोरीला जाण्याचे प्रमाण अधिक आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारातून, जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारातून गेल्या काही दिवसांत अनेक दुचाक्या चोरीला गेल्या आहेत. त्यातील एकाही गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. सावेडी उपनगरात नागरिकांच्या रहिवासी इमारतीच्या पार्किंग मधून रात्रीच्या वेळी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे तोफखाना पोलिस ठाण्यात वाहन चोरीचे सर्वाधिक गुन्हे दाखल झाले आहेत.

शहरात कधी कधी एकाच दिवसात ४ ते ५ दुचाक्या चोरीला जाण्याच्या घटना घडल्या आहेत. परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये हे चोर कैद होतात. पण पोलिसांना ते हाती लागत नसल्याने वाहने चोरीला गेलेले नागरिक हतबल झाले आहेत. सध्या दुचाकी वाहनांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. कोणतीही दुचाकी खरेदी करायला गेले की किमान लाखभर रुपये मोजावे लागतात. अनेक जण फायनान्स कंपन्यांचे कर्ज घेवून वाहने खरेदी करतात पण ते कर्ज फिटायच्या पूर्वीच दुचाकी चोरीला गेल्याने वाहन तर गेले वरून डोक्यावर कर्ज तसेच राहिले अशी अवस्था नागरिकांची होत आहे.

### २ दिवसांत वाहनचोरीचे १६ गुन्हे दाखल

जिल्हा भरात मंगळवारी (दि.१०) दिवसभरात ९ मोटारसायकल चोरीचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात नगर शहरातील तोफखाना पोलिस ठाण्यात ३, शिर्डी पोलिस ठाण्यात २, घारगाव, राहुरी, श्रीरामपूर शहर, जामखेड पोलिस ठाण्यात प्रत्येकी १ असे गुन्हे दाखल झाले आहेत. तर सोमवारी (दि.९) शेवगाव, नेवासा, कोपरगाव तालुका, घारगाव, तोफखाना प्रत्येकी १ व शिर्डी २ असे एकूण ७ गुन्हे दाखल झालेले आहेत. दाखल गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, मात्र एकाही गुन्ह्याचा तपास लागत नसल्याचे चित्र आहे.

### सिटी लॉन समोरून मोटारसायकलची चोरी

नगर ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील सिटी लॉन समोर पार्किंग मध्ये हॅण्डेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र.एम एच १७ बी जे ७१९३ ) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डेल लॉक तोडून बनावट चावीने सुरू करून चोरून नेली. याबाबत कैलास चंद्रकांत मांजरे (रा. मांजरी, ता. राहुरी) यांच्या फिर्यादी वरून तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### सावेडी उपनगरातून मोटारसायकलची चोरी

सावेडी परिसरातील भिस्तबाग चौका जवळील पवन नगर येथील मारुती कॉम्प्लेक्स समोर हॅण्डेल लॉक करून लावलेली टीव्हीएस कंपनीची अपाची मोटारसायकल (क्र.एम एच १७ सी एफ ८२३८ ) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डेल लॉक तोडून बनावट चावीने सुरु करून चोरून नेली. याप्रकरणी रमेश एकनाथ भवार (वय ३०, रा.राघवेंद्र स्वामी मंदिराशेजारी बोल्हेगाव) यांनी दिलेले फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करून लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. एम एच १६ एल डी २८८६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी अश्विनी सूरज शिंदे (वय २६, रा. करंदीकर हॉस्पिटल मागे, वाघमळा, बालिकाश्रम रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
३ डिसेंबरपासून सुरू..



खास आकर्षण
लखनवी चिकन सुट • सहारनपुर फर्नीचर • राजस्थानी बांगड्या • राजस्थानी पेंटिंग्स • बनारसी साड्या • पश्चिम बंगाल साड्या • चंदेरी सिल्क साड्या • बेड कव्हर्स • दिवान सेट • केरळ ज्वेलरी • सतरंजी • मोजडी • फॅन्सी चप्पल • लेदर बॅग्स • टॉप्स • टी-शर्टस् • कारपेट • पंजाबी सुट • मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स • जयपुरी जूती • ब्लॉक प्रिंट • खुर्जा क्रॉकरी • टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

# उच्च सुरक्षा नोंदणी नंबर प्लेट वाहनांना बसवणे बंधनकारक

## ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत, अन्यथा १० हजार रुपयांचा दंड

मुंबई - राज्य परिवहन विभागाने (आरटीओ) २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांवर 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' (एचएसआरपी) लावण्याची मोहीम अधिक तीव्र केली आहे. ३१ मार्च २०२५ पूर्वी सर्व गाड्यांना 'एचएसआर' नंबर प्लेट बंधनकारक करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून 'एचएसआरपी' नसलेल्या सर्व गाड्यांवर मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

हाय सिक्युरिटी नंबर प्लेट वाहनाच्या सुरक्षेसाठी तयार करण्यात आली आहे. ही प्लेट एचएसआरपी होलोग्राम स्टिकरसह येते. त्यावर वाहनाचे इंजिन आणि चेसिस क्रमांक लिहिलेला असतो आणि हा क्रमांक *(पुढील मजकूर पान २ वर)*

दुकान भाड्याने देणे आहे
नवीपेठ मध्ये पोखरणा ज्वेलर्स शेजारी 300 स्के.फू. दुकान भाड्याने देणे आहे
Mo. 7350012310 / 8888965980

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




श्रध्देय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त
न्यु लाईफ मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल व मोरया क्लिनीकल लॅब, त्रिशा क्लिनीक व अवनी मेडीकल, ऋग्वेद मेडीकल यांच्या संयुक्त विद्यमाने
भव्य आरोग्य तपासणी शिबीर
दि. १२ व १३ डिसेंबर २०२४ रोजी स. ९.०० ते संध्या ७.००
• प्रमुख उपस्थिती •
मा. सचिन आबा कोतकर (संचालक संदिप उद्योग समूह)
मा. गणेश अंज्याबापु सातपुते (संस्थापक अध्यक्ष - विश्वेश्वर प्रतिष्ठान)
मा. गणेश आनंदकर (अध्यक्ष श्री प्रतिष्ठान, अहिल्यानगर)
• मोफत रक्तदाब तपासणी
• रक्तातील साखर तपासणी / किडनी विकार
• ह्रदयविकार मधुमेह, गुडघेदुखी, बालरोग, होमिर्पॅथिक
• त्वचा विकार / केस गळणे
• पोटाचे विकार
डॉ अनिकेत गगे BHMS | डॉ सुनील बांगरे DHMS
• टिप •
कुठल्याही रक्त तपासणी वर ५०% सूट व शिबिरामध्ये तपासणी नंतर कुठल्याही शस्त्रक्रियेवर २०% सूट
• ठिकाण •
त्रिशा क्लिनिक, वर्कशॉप समोर, राधाकृष्ण कॉलनी, नेप्ती रोड, केडगाव, अहिल्यानगर
संपर्क : मो. 9370238501, 7823878813, 9764768767, 8282848287

साडी खरेदीकरिता..
सर्व प्रकारच्या सहावार / नऊवार
श्रध्दा-टेक्स होलसेल साडी डेपो
शॉप नं.सीएस-३, एके-१ बिल्डींग, आयटीआय, मेन गेटसमोर, अकोलकर हॉस्पिटलजवळ
रविवार बंद
बुरुडगाव रोड, अहिल्यानगर मो : 9822257112

मोपेड टू व्हिलर शिकवली जाईल
नाताळाच्या सुट्टीनिमित्त महिला व मुलींना खात्रीशीर मोपेड टू व्हिलर शिकवली जाईल
सुवर्णसंधी
समक्ष भेटा
7448149090

पुन्हा एकदा शिबीर
कान - वधळलेले कान चिटकवा
नाक - सर्दी खोकला उपाय
डोळा - मोतीबिंदूसाठी ड्रॉप वापरा
स्कीन - टॅटू+मोस+गोंधन काढणे
काळेडाग पिंपल्स खाज येणे
डॉ.मंजूषा 7507718246

हिमालय, पारस, प्लास्टो व सिंटेक्स
या कंपन्यांचे १०० लिटर ते ५००० लिटर पर्यंतच्या टाक्या १० वर्षे गॅरंटीसह उपलब्ध..
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
• सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## गीता जयंतीचे शुभचिंतन


मानव जातीला कसं जीवन जगावं, मानवता व समतेचा कसा अंगीकार करावा याचा संदेश देते ती पूजनीय भगवत्‌गीता!

ज्ञानामृताने अवघ्या सृष्टीसह मानवाचे पोषण करणारी माता म्हणजे श्रीमद् भगवत्‌गीता! आज मोक्षदा एकादशी, मौनी (जैन) एकादशी आणि ग्रंथराज गीतेची जयंती.

देवदेवतांसह महान विभूतींच्या जयंत्या साजऱ्या होणे स्वाभाविक पण एक जीवनदायिनी ग्रंथाची जयंती दिन साजरा करणारा आपला भारत देश एकमेवच असावा. आजच्या गोंधळलेल्या, केवळ स्वार्थात गुंतलेल्या युगात गीतेचे महत्त्व अधिकच आहे. गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सत्त्वगुण जोपासनेचा मार्ग सांगितलाय. तो सर्व अभिलेषेपासून मुक्त होण्याचा, भक्तीचा अन् कर्मयोगाचा मार्ग आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

स्वत:साठी कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता इतरांना मुक्तपणे देत जावे अशी शिकवण त्यात आहे. याचे अनुसरण आपण केले व इतरांच्या भल्यासाठी आपली उर्जा वापरली तर सार्थकतेच्या प्रबुद्ध अवस्थेकडे आपला प्रवास सुरू होईल.



विश्वसंत ज्ञानेश्वर माउलींनीही ज्ञानेश्वरीतून गीता महात्म्य सांगितले आहे. गीतेतील प्रत्येक अध्यायाला 'योग' म्हटलं आहे. यातील ७०० श्लोकांपैकी एकातरी श्लोकातील एक शब्द जरी जगता आला तरी जन्माचे सार्थक होईल!

आजच्या शुभदिनी जगद्‌गुरु योगेश्वरांसह पावन पवित्र गीतेचे शुभचिंतन करूया.

# 'विधानसभे'च्या मतदानाच्या वेबकास्टिंगसाठी केंद्रांवर लावलेल्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची चोरी

### केडगाव व माळीवाडा येथील मतदान केंद्रांवरील प्रकार, अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मतदान केंद्रावर सुरक्षेच्या उद्देशाने बसविलेले सीसीटीव्ही कॅमेरे कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे समोर आले आहे. केडगाव च्या शिवाजीनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील मतदान केंद्र क्र.२६७, २६९, २७० तसेच माळीवाडा परिसरातील हिराबाई सुर्यवंशी प्राथमिक शाळा येथील मतदान केंद्र क्र.२२१, २२२ या ठिकाणी हा प्रकार घडला आहे.

याबाबतची माहिती अशी की नुकत्याच झालेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी नगर शहर मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर निवडणूक प्रशासनाने वेबकास्टिंग केले होते. सदर वेबकास्टिंग करण्याचे काम मॅनेजिंग डायरेक्टर, आयनेट सिक्युअर लॅब प्रा. लि. चेन्नई या कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीमार्फत नगर शहारामधील सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करीता आतील बाजु व बाहेरील बाजु मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम महेश सुभाष गवळी (वय ३२, रा.पागीरे पेट्रोल पंपाजवळ, घोडेगाव, ता. नेवासा) यांना देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि. १६ नोव्हेंबर रोजी रात्री साडे आठ वाजल्या पासुन नगर शहर अंतर्गत मतदान केंद्रावरील प्रत्येक बुथवर वेबकॅमेरे बसवण्याचे काम सुरु केले होते.




केडगाव व माळीवाडा येथील याच मतदान केंद्रांवरील सीसीटीव्ही कॅमेरे चोरीला गेले आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवाजीनगर, केडगाव येथील बुथ क्रमांक २६७ मधील आतील बाजुचा कॅमेरा नंबर एच एफ ४ जी ०५३८८४ तसेच बुथ क्र- २६९ येथील बाहेरील बाजुचा कॅमेरा क्र एच एफ ४ जी ०७१२७७ त्यानंतर बुथ क्र २७० बाहेरील बाजुचा कॅमेरा क्र- एच एफ ४ जी ०६५७५० तसेच हिराबाई सुर्यवंशी प्राथमिक शाळा माळीवाडा, रुम नं ३ बुध नं. २२२ बाहेरील बाजुचा कॅमेरा नं एच एफ ४ जी ०५०७३७, रुम नं-२ बुथ नं. २२१ बाहेरील बाजुचा कॅमेरा नं- एच एफ ४ जी ०६६६३९, असे वेगवेगळ्या नंबरचे कॅमेरे बसवण्यात आले होते.

२० नोव्हेंबर रोजी मतदान झाल्यानंतर २१ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजण्याचे सुमारास केडगाव येथील बुथवर लावलेले कॅमेरे काढण्याकरीता गवळी यांचे कर्मचारी गेले असता केडगाव येथील १५ हजार रुपये किमतीचे ३ कॅमेरे दिसुन आले नाही. त्याबाबत आजुबाजुस चौकशी केली असता काहीएक माहिती मिळाली नाही. त्यानंतर सकाळी ९ च्या सुमारास माळीवाडा येथील बुथवर लावलेले कॅमेरे काढण्याकरीता गेले असता तेथील १० हजार रुपये किमतीचे २ कॅमेरे दिसुन आले नाही. त्याबाबत आजुबाजुस चौकशी केली असता काहीएक माहिती न मिळाल्याने खात्री झाली की केडगाव व माळीवाडा येथील कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी पाच बूथ वरील एकूण २५ हजार रुपये किंमतीचे कॅमेरे चोरुन नेले आहेत. या प्रकरणी महेश गवळी यांनी मंगळवारी (दि.१०) सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## उच्च सुरक्षा नोंदणी नंबर प्लेट वाहनांना बसवणे बंधनकारक

(पान १ वरुन)

प्रेशर मशीनद्वारे लिहिला जातो. केंद्रीय डाटाबेसमध्ये या सर्व माहितीची नोंद केली जाते. वाहनाची चोरी होऊ नये, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करता यावी, याकरिता राज्यात २०१९ पासून नव्या उत्पादित वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट सक्तीची केली आहे. ही नंबर प्लेट वाहनाला लावल्यानंतर पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने नंबर प्लेट बनविलेली असते. त्यामुळे क्रमांकात छेडछाड करता येत नाही.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्वच वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी अनिवार्य करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार परिवहन विभागाने ३१ मार्च २०२५ पर्यंत जुन्या वाहनांची नोंदणी करणे आणि त्यानंतरच्या तीन महिन्यांत क्रमांक पाटी बसविणे अनिवार्य केले आहे.

दरम्यान, उच्च सुरक्षा नंबर प्लेट बसविण्यासाठी संबंधित कंपनी वाहनाच्या संख्येनुसार शहरात व जिल्ह्यात केंद्र स्थापन करणार आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत केंद्रांची संख्या अधिक असेल. मात्र, अन्य जिल्ह्यांत सरासरी आठ ते दहा केंद्र स्थापन केले जातील. शिवाय ही नंबर प्लेट बसविण्यापूर्वी ऑनलाइन पोर्टलवर आगाऊ नोंदणी करून वेळदेखील घ्यावी लागणार आहे. दिलेल्या वेळेतच वाहनांना नंबर प्लेट बसविल्या जातील.

### असे आहेत दर

दुचाकी आणि ट्रॅक्टर ४५० रुपये, तीन चाकी ५०० रुपये, चारचाकी ७५० रुपये (जीएसटी अतिरिक्त)

## केडगावमधून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

नगर - सतरा वर्षीय अल्पवयीन मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्याची घटना केडगाव परिसरातील दूधसागर सोसायटी येथे सोमवारी (दि.९) रात्री १२ ते मंगळवार (दि.१०) सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबतची मुलाच्या आईने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मुलगा हे नेहमीप्रमाणे घरात झोपले होते. मंगळवारी सकाळी त्या झोपेतून उठल्यावर त्यांना मुलगा दिसून आला नाही. त्यांनी त्याचा केडगाव परिसरात त्याचा शोध घेतला तसेच स्टेशन परिसरातही मुलाचा शोध घेतला परंतु तो कुठेही मिळून आला नाही. त्यामुळे त्यांनी याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाच्या गुन्ह्याची नोंद केली.

# नगरमधून दोन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळविले

### अज्ञात व्यक्तींच्या विरोधात तोफखाना, एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

नगर - नगर शहरासह जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढतच असून अशाच आणखी दोन घटना नगर शहरात घडल्या आहेत. तारकपूर परिसरातून एका १७ वर्षीय तर निंबळक बायपास चौकाजवळील कोतकर वस्ती येथून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी २ अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत बोल्हेगाव फाटा येथील अल्पवयीन मुलगी आई सोबत दि.७ डिसेंबर रोजी तारकपूर परिसरातील एका रुग्णालयात आली होती. दुपारी १२.३० च्या सुमारास ती पाण्याची बाटली घेवून येते असे सांगून बाहेर गेली ती पुन्हा बराच वेळ परत आली नाही. त्यामुळे तिच्या आईने आजुबाजुच्या परीसरात शोध घेतला पण ती मिळून आली नाही. त्यानंतर दोन दिवस तिचा शोध घेवूनही ती सापडली नाही. त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर महिलेने सोमवारी (दि.९) तोफखाना पोलीस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत निंबळक बायपास चौकाजवळील कोतकर वस्ती येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी सोमवारी (दि.९) सकाळी ८ च्या सुमारास घरासमोरून बेपत्ता झाली. बराच वेळ झाला तरी मुलगी घरी न आल्याने तिच्या कुटुंबीयांनी आजुबाजुच्या परीसरात शोध घेतला असता काहीही माहिती भेटली नसुन ती कोठेही मिळुन आली नाही. त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर मुलीच्या वडिलांनी सोमवारी (दि.९) सायंकाळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## नदीतील पाण्यात आढळला बेपत्ता झालेल्या वृद्धाचा मृतदेह

नगर - नगर तालुक्यातील हमीदपूर येथील बेपत्ता असलेल्या सिताराम भाऊसाहेब जाधव (वय ६०) यांचा मृतदेह मंगळवारी (दि.१०) सकाळी १०.४५ च्या सुमारास हिंगणगाव येथील स्मशानभूमीजवळ नदीच्या पाण्यात आढळून आला आहे.



सिताराम जाधव

मयत जाधव हे ६ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजेपासून हिंगणगाव परिसरातून बेपत्ता झालेले होते, त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक त्यांचा शोध घेत होते. सोशल मिडीयावरही त्याबाबत आवाहन कुटुंबीयांनी केलेले होते. मात्र त्यांचा ३-४ दिवसांत शोध लागलेला नव्हता. मंगळवारी (दि.१०) सकाळी १०.४५ च्या सुमारास हिंगणगाव येथील स्मशानभूमीजवळ नदीच्या पाण्यात एक मृतदेह आढळून आला तो सीताराम जाधव यांचाच असल्याचे स्पष्ट झाले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पो.ना.भागवत हे करीत आहेत.

## मोटारसायकलवरुन दारु विक्री करणाऱ्यास माळीवाड्यात पकडले

### २६ हजार २६० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर - बेकायदेशीररित्या मोटारसायकल वरून देशी दारू आणून रस्त्याच्या कडेला दारू विक्री करणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. त्याच्याकडील १ हजार २६० रुपये किमतीची देशी दारू जप्त केली. ही कारवाई माळीवाडा बस स्थानक ते माळीवाडा वेस रोड दरम्यान शिवसंग्राम वाईन दुकानासमोर करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की माळीवाडा बस स्थानक ते माळीवाडा वेस रोडवर शिवसंग्राम वाईन दुकानासमोर एक इसम मोटारसायकलवर देशी दारू आणून रस्त्यावर विक्री करीत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे सूचनेवरून पोलिसांनी त्या ठिकाणी खात्री केली असता एक इसम त्याच्याकडील होंडा कंपनीची शाईन मोटरसायकलला (क्र. एम एच १६ ए झेड ६३४३) असलेल्या पिशवीतून देशी दारूची विक्री करताना दिसून आला.

त्याच्याजवळ दोन ते तीन इसम दारू घेण्यासाठी थांबलेले दिसून आले. पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांना पाहताच ते इसम पळून गेले. मोटार सायकल स्वारास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याचे नाव विचारले असता त्याने अविनाश महादेव इंगळे (रा. निंबोडी, ता. नगर) असे असल्याचे सांगितले पोलिसांनी त्याच्याकडील पिशवीची झडती घेतली असता त्यात देशी दारूच्या १ हजार २६० रुपये किमतीच्या १८ बॉटल मिळून आल्या. पोलिसांनी त्याच्याकडील २५ हजार रुपये किमतीची मोटरसायकल व दारू असा २६ हजार २६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो. कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अविनाश इंगळे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्ह्याची नोंद केली पुढील कारवाई पोलीस हवालदार संदीप पितळे हे करीत आहे.

## आकडा टाकून घरात वीजचोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

### 'महावितरण'च्या पथकाची कारवाई

नगर - गेल्या वर्षभरापासून तारेवर आकडा टाकून घरात सुरु असलेली वीजचोरी महावितरणच्या पथकाने पकडली आहे. सुमारे ११ हजार ६७० रुपये किमतीची ४८६ युनिट वीज चोरी करणाऱ्या घरमालकाविरुद्ध नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुस्ताक आयुब शेख (रा. निमगाव वाघा, ता.नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत महावितरणच्या जखणगाव शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संदीप विठ्ठल बराट (वय ४२, रा. देहरे ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. अभियंता बराट यांच्यासह कर्मचारी हेमंत सोनवणे, सागर उदार हे दोन पंचांना घेवून २६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास निमगाव वाघा गावात वीजचोरी शोधण्यासाठी गेले असता मयत आयुब कादर शेख यांच्या नावावर वीजजोड असलेल्या घरात सध्या राहात असलेला त्यांचा मुलगा मुस्ताक आयुब शेख यांना ओळखपत्र दाखवत घरातील वीजजोडणी तपासली असता त्यांनी त्यांच्या घराच्या बाजूला असलेल्या एल टी पोलच्या फेज व न्युट्रलला आकडा टाकून अंदाजे ८० फुट लांबीची काळ्या रंगाची केबल वापरून घरामध्ये अनाधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे आढळून आले.

सदर काळ्या रंगाच्या अंदाजे ८० फुट लांबीच्या सर्विस केबलवर मुस्ताक शेख यांनी मागील १२ महिन्यापासून महावितरण कंपनीची ४८६ युनिटची वीजचोरी केली असून त्याची किंमत ९ हजार ६७० व कलम १५२ प्रमाणे तडजोड रक्कम २ हजार अशी एकूण ११ हजार ६७० रुपये रकमेची वीज चोरी केलेली आहे. मुस्ताक शेख यांना वीज चोरीचे देयक देण्यात आले व ते भरण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात आली. मात्र त्यांनी मुदतीत वीज बिल भरणा न केल्याने त्यांच्याविरुद्ध भारतीय वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार फिर्याद देत असल्याचे अभियंता बराट यांनी म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी घरमालक मुस्ताक शेख यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सुरेशलाल भळगट यांचे दुख:द निधन



नगर - येथील रहिवासी व उद्योगपती सुरेशलाल शांतीलाल भळगट (जामखेडवाला, वय ७०, रा.जामखेड) यांचे हृदयविकाराने ११ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तपनेश्वर रोड, अमरधाम, जामखेड येथे बुधवारी सायंकाळी ७.१५ वा. अंत्यसंस्कार होणार आहे.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अजित, गणेश भळगट, सौ.योगीता स्वप्निल बोरा (इचलकरंजी) यांचे ते वडील तर रमेश, प्रकाश, सुभाष यांचे बंधू होत.

# जिल्हा परिषदेच्या अग्निशमन बॉक्समध्ये आढळून आल्या चक्क 'दारुच्या बाटल्या'

नगर - नाशिक, मुंबई येथे झालेल्या आगीच्या दुर्घटनेत अनेक लोक मृत पावले आहेत. महाराष्ट्र शासनाने शासकीय कार्यालयातील अग्निशमन व्यवस्थेचे पुन्हा एकदा ऑडिट करणे आवश्यक आहे, असे असताना अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अग्निशमन बॉक्समध्ये चक्क दारूच्या बाटल्या मिळून आल्याने हा चर्चेचा विषय बनला आहे

अहिल्यानगर जिल्हा परिषद कार्यालय जिल्ह्यातील मिनी मंत्रालय असल्याने येथे जिल्ह्यातील अनेक नेते तसेच ग्रामस्थ यांचे विविध कामांसाठी येणे जाणे असते. तसेच शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, ग्राम विकास, समाज कल्याण, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी अधिकारी, मुद्रण विभाग असे विविध विभागांशी जोडले गेल्याने मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेत लोकांची वर्दळ असते.परंतु जिल्हा परिषदेचा सुरक्षा विभागाचे अग्निशमन व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. यामुळे जर आगीची घटना घडली तर मोठी दुर्घटना घडू शकते. जिल्हा परिषद प्रशासनाने फायर ऑडिट करणे आवश्यक आहे.यामुळे मोठी जीवीत हानी टळू शकते.




अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अग्निशमन बॉक्समध्ये चक्क दारूच्या बाटल्या आढळून आल्या.

जिल्हा परिषदेच्या अग्निशमन बॉक्समध्ये दारूच्या बाटल्या आढळल्याने या दारूच्या बाटल्या नेमक्या कोणाच्या? जिल्हा परिषद मध्ये नेमके काय चालते ? यावर कुणाचाच अंकुश नसल्याने आंधळं दळतयं आणि कुत्र पीठ खातयं... अशीच अवस्था जिल्हा परिषद मध्ये असल्याचे दिसून येते.

## जयवंतराव भोसले यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील रहिवासी जयवंतराव माधवराव भोसले (वय ९०, रा.काष्टी, ता.श्रीगोंदा) यांचे १० डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर काष्टी वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ५ भाऊ, भाऊजय, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. दत्तात्रय भोसले यांचे ते वडील होत.

## वत्सलबाई बोऱ्हाडे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील वत्सलबाई किसनराव बोऱ्हाडे (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

अशोक बोऱ्हाडे यांच्या मातोश्री, आर्किटेक्ट रुपेश दिपक बोऱ्हाडे व आर्किटेक्ट ऋषिकेश दिपक बोऱ्हाडे यांच्या आजी होत

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात वजन ठेवा नियंत्रणात

हिवाळ्यात थंडीमुळे आपण अनेकदा अशा गोष्टी खातो ज्यामुळे आपल्या आरोग्याला हानी पोहोचते. चला जाणून घेऊया अशा गोष्टींबद्दल ज्या आपण आपल्या आहारापासून दूर ठेवल्या पाहिजेत. पकोडे, समोरे अशा तळलेल्या गोष्टी, गुळ, गाजराचा हलवा, मिठाई असे गोड पदार्थ, चहा व कॉफी ऐवजी हर्बल टी घ्यावा, मिठाचे जास्त प्रमाण असलेले अन्न वेफर्स वगैरे त्याचप्रमाणे दही, लोणी सारखे पदार्थ अती प्रमाणात खाणे टाळावे. सुका मेवा आरोग्यासाठी फायदेशीर असतो परंतु तो मर्यादित प्रमाणात खावा.

## पाककला

### बेसन भुर्जी

**साहित्य :** एक वाटी बेसन, एक कांदा, एक टोमॅटो, दोन हिरवी मिरची, कोथिंबीर, अर्धा चमचा हळद, तिखट अर्धा चमचा, अर्धा चमचा जिरे, दोन चमचे तेल, १ कप पाणी

**कृती :** सर्वात आधी एका बाऊलमध्ये बेसन चाळून घ्यावे. आता त्या बेसनमध्ये हळद, तिखट, पाणी आणि मीठ घालून चांगल्या प्रकारे मिक्स करावे.

आता एका कढईमध्ये तेल गरम करून घ्यावे. त्यामध्ये जिरे घालावे. तसेच टोमॅटो घालावे. आता या मध्ये कांदा आणि हिरवी मिरची घालून परतवून घ्यावे. नंतर तयार बेसन घोळ कढईमध्ये घालावा.हे मिश्रण लहान गॅस ठेऊन हलवत राहावे. जो पर्यंत हे घट्ट होत नाही. घट्ट झाले की भुर्जी बनेल. ही भुर्जी पोळी किंवा पराठ्या सोबत खा.

## वास्तू

### घरात ठेवा चांदीचा मोर

ज्योतिष शास्त्रानुसार घरामध्ये चांदीचा मोर ठेवल्याने नकारात्मकता दूर होते आणि सुख-समृद्धी येते. ड्रॉइंग रूममध्ये ठेवल्याने व्यक्तीचे अशुभ दूर होते आणि व्यक्तीला प्रत्येक कामात यश मिळते. ज्या लोकांच्या वैवाहिक जीवनात कोणत्याही प्रकारची समस्या असेल त्यांनी आपल्या घरात चांदीच्या मोराची जोडी जरूर ठेवावी.

## सल्ला

केळ्याच्या साली आपण टाकून देतो. त्याऐवजी त्या चिरुन त्यात वालाची डाळ डाळ घालून भाजी करावी.

## सौंदर्य

लसणाच्या दोन पाकळ्या बारीक करून त्यात गुलाबजलाचे काही थेंब टाका. ते प्रभावीत भागावार लावा. १०-१५ मिनिटांनी चेहरा धुवा. पेपल्स कोरडे होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, अश्विनी ०९।५३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न कराल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. कार्यालयीन कामकाजात अनुभवींचे मार्गदर्शन मिळेल.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करण्याऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : रागावर संयम न ठेवल्यान प्रतिमा मलीन होईल. मात्र कामामध्ये यश मिळेल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू कराल. सरकार विरोधी कारवायांपासून त्रास संभवतो.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. मागील उधारी वसुल होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा-वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर** : आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल. भाऊबंद डोके वर काढतील.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडल्यामुळे फायदा होईल.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक केल्यास लाभ होईल. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**सर** - सांगा पाहू सगळ्यात जुना प्राणी कोणता?
**मंजू** - झेब्रा.
**सर** - असं का बरं?
**मंजू** - कारण तो ब्लॅक अण्ड व्हाईट असतो ना

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात कितवा क्रमांक लागतो? - सातवा
* इराणमधील सार्वात मोठे शहर कोणते? - तेहरान
* जगातला सर्वात मोठा पाण्याचा भाग कोणत्या देशात आहे? - रशिया
* थेरवडा बुद्धीझम (बुद्धस्मारक) कोठे आहे? - थायलंड

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ■ | |
| | ■ | ९ | | | ■ | १० | |
| ११ | १२ | | ■ | १३ | १४ | | |
| १५ | | ■ | १६ | ■ | १७ | | ■ |
| ■ | १८ | १९ | | | ■ | २० | २१ |
| २२ | ■ | २३ | | ■ | २४ | | |
| २५ | | | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) पाचांचा समूह ४) संकट; अरिष्ट; आपत्ती ७) पाणी अडविण्यासाठी नदीच्या वगैरे पात्रात बांधलेली आडवी भिंत ८) तीन गुणांपैकी एक; धूळ ९) भांडखोर (स्त्री) १०) पैसा; अडका ११) तूर वगैरेची डाळ शिजवून केलेले एक पातळ कालवण १३) डिंक ठेवण्याचे पात्र १५) मशक; मच्छर १७) एक छोटा भित्रा जंगली प्राणी १८) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो एक सन्मानदर्शक शब्द २०) सुवर्ण; कनक; सोने २३) फळातील रसाळ भाग; मगज २४) एक चर्मवाद्य २५) प्रचार करणारा

### शब्दगंध क्र. ७०६८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | य | सू | च | क | ता | ■ |
| हो | न | ■ | न | र | व | र | ■ |
| द | स | रा | ■ | ■ | ड | ■ | अ |
| र | ब | ■ | रा | व | सा | हे | ब |
| ■ | दा | बा | ■ | डा | ■ | मा | ला |
| फा | र | क | त | ■ | ■ | मा | ■ |
| य | ■ | ■ | बे | ■ | मा | लि | का |
| दा | म | ■ | ला | थ | ■ | नी | ळ |

**उभे शब्द :-** १) पंधरा दिवसांचा समूह; पक्ष २) चल; जंगम; हेर; खंदक ३) अंग मोडून येणे ४) छातीच्या हाडांचा सापळा; फासळी ५) लज्जा; शरम; हया ६) स्त्रियांचा एक दागिना १०) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १२) जीभ; एक पेय; जिव्हा १४) परीक्षा; चाचणी; सत्त्व १६) चिरणारे; फाडणारे १९) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; नक्र २१) पाकिस्तानच्या या मुलीला नोबेल पारितोषिक मिळाले २२) ब्राह्मण; द्वीज २४) अंदाज; अनुमान; कयास २५) प्रचार करणारा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : स्वतःवर विश्वास ठेवा, कारण आत्मविश्वासाने जग जिंकता येते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### हात पायांना मुंग्या का येतात?

हात आणि पायाच्या बोटांमध्ये मुंग्या येणे हे विशिष्ट व्हिटॅमिनच्या कमतरतेचे लक्षण नाही. हात आणि पायाच्या बोटांच्या सांध्यामध्ये सूज येणे किंवा मुंग्या येणे ही एक सामान्य समस्या असू शकते. याव्यतिरिक्त, हात आणि पायाच्या बोटांमध्ये मुंग्या येण्याची अनेक कारणे असू शकतात, जसे की अन्नात पोषक तत्वांची कमतरता, मज्ञातंतू आणि हाडांचे आजार आणि रोगांशी संबंधित इतर घटक. व्हिटॅमिन डी ची कमतरता हा एक घटक असू शकतो जो मुंग्या येणे आणि इतर समस्यांच्या विकासाशी संबंधित आहे. व्हिटॅमिन डी आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे.

व्हिटॅमिन डी चे मुख्य कार्य म्हणजे आपली हाडे आणि स्नायू निरोगी करणे. हे जीवनसत्त्व सूर्याच्या किरणांमध्ये असते. शरीरात व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे आपल्या शरीरात काही समस्या उद्‌भवू शकतात.

## सद्‌सद्‌विवेक

एका घनदाट जंगलात एक भल्यामोठ्या वृक्षावर अनेक बगळे राहायचे. त्या वृक्षाच्या खोडाजवळ म्हणजे पायथ्याशी एक साप देखील राहायचा. हा दुष्ट साप बगळ्याची पिल्ले खाऊन टाकायचा. आता एक बगळा आपले पिल्ले साप खाऊन टाकतो म्हणून उदास झाला व एका नदीच्या किनाऱ्यावर जाऊन बसला. त्याच्या डोळ्यामध्ये पाणी आले.

उदास बगळ्याला पाहून खेकडा म्हणाला की, ''बगळे दादा काय झाले तुम्ही असे उदास का बसले आहात?'' त्यावर बगळा म्हणाला की,

''काय करू खेकडे दादा एक साप माझ्या पिल्लांना खाऊन टाकतो. समजत नाही आहे मी त्या सापाचा सामना कसा करू ते. तुमच्याकडे जर काही उपाय असेल तर मला सांगाल.''

आता खेकड्याने मनात विचार केला की, ''हा बगळा माझा जन्मजात शत्रू आहे, मी त्याला एक उपाय सांगेन जो सापासह त्याचा नाश करेल.''

आता खेकडा बगळ्याला म्हणाला की, ''एक काम करा, मांसाचे तुकडे घ्या आणि मुंगूसाच्या बिळासमोर ठेवा. त्यानंतर त्या बिळापासून सापाच्या बिळापर्यंत अनेक तुकडे पसरवा. मुंगूस ते तुकडे खाऊन सापाच्या बिळापर्यंत येईल. आणि जर त्याला तिथे साप दिसला तर तो त्याला ठार करेल. बगळ्याला खेकड्याने सुचवलेली युक्ती आवडली. बगळ्यानेही तेच केले. तसेच ठरल्याप्रमाणे तसेच झाले. मुंगूसाने साप खाल्ला पण सापानंतर त्या झाडावर राहणाऱ्या बगळ्यांनाही खाऊन टाकले. बगळ्याने उपाय तर केला परंतु त्याचे इतर परिणाम विचारात घेतले नाहीत. त्याच्या मूर्खपणाचे फळ त्याला मिळाले.

**तात्पर्य** : कोणतेही कार्य करण्यापुर्वी आधी विचार करावा.

# रहमते दर्शन (भाग - १)



सभी धर्मों के नेताओं और मार्गदर्शकों में सृष्टिकर्त्ता का रूप देखते हैं। यही कारण है कि जहाँ उन्होंने गुरु नानक जी बाबा सावनसिंह जी महाराज, संत कृपालसिंह जी आदि पर श्रद्धा और प्रेम से भरपूर नज़्में लिखी हैं, वहीं मरियम, ईसा, मुहम्मद साहब, हज़रत अली, इमाम हुसैन और सूफ़ियों में अमीर खुसरौ, निज़ामुद्दीन औलिया आदि पर भी उसी श्रद्धा से नज़्में लिखी हैं और कहीं भी किसी को भी उनके स्थान से गिरने नहीं दिया। 'जादए-नूर में अली जवाद जैदी ने इसे स्वीकारते हुए लिखा है,

दर्शन के सामने यह बड़ी मंजिल थी कि सारे धर्मों के महान आदर्शों और पैग़म्बरों पर ऐसी नपी-तुली बात कहें कि सभी उस पर झूम जायें, उससे आध्यात्मिक आनंद प्राप्त करें और उनके मस्तिष्क में रस और अन्तर में आनंद हो और पाठकों में उसका एहसास उभरे। हर धर्म के मानने वाले को अपना धार्मिक लीडर प्यारा होता है, लेकिन जब वे दर्शन से उसकी चर्चा और वर्णन सुनेंगे, तो उन्हें ऐसा मालूम होगा कि भाव उनके हैं, भाषा और बयान दर्शन के हैं। इस कठिन मंजिल से दर्शन बड़ी दीदावरी और प्रेम में डूब कर कामयाब

### प्रस्तावना

होकर गुज़रे हैं। दर्शन ने जिस प्रकार धार्मिक नेताओं और विभिन्न मतों के संतों के लिए प्रेम और श्रद्धा से भरपूर नज़्में लिखी हैं, उसी तरह राष्ट्र के नेताओं, कला के उस्तादों (गुरुओं) और त्यौहार और आयोजनों पर उनकी नज़्में उनके प्रेम और सेक्युलर सोच की द्योतक हैं। उनका साहित्य प्रेम और इल्मे दोस्ती अपनी आप मिसाल है। कृपाल आश्रम उनके साहित्य प्रेम के कारण शायरों और साहित्यकारों को भी एक साथ मिल बैठने के अवसर जुटाता रहा है। इस तरह उन्होंने हर स्कूल के विचारकों को आमंत्रित किया कि. आओ मिलजुल के मुहब्बत की वो मंज़िल ढूँढें, जिस पै तूफ़ान से मिले अम्न वह साहिल ढूँढें । दिल में फिर ताज़ा तमन्ना का कंवल खिल जाये, फिर ये रूठा हुआ इंसान गले मिल जाये । जज्बए इश्क जो सीने में वां हो जाये,

महाराज जी ने अपने अंग्रेजी एड्रेसों के संग्रह के लिए रात के तीन बजे टेलीफ़ोन पर लेख का आखिरी टुकड़ा लिखाते हुए कहा था, जिसका अनुवाद अली जवाद जैदी के शब्दों में देखें कि किस तरह वे शायरी, कला और जीवन के लक्ष्य के बारे में अपने नज़रिए (दृष्टिकोणों) का एक सुन्दर और आकर्षक पहलू पेश कर देना चाहते हैं।

सम्भव है कि अपनी लम्बी साहित्य यात्रा में मैं अपने विचारों को हमेशा एक सी कलात्मक विधि से अपने शेरों में न पेश कर सका हूँ, यह निष्कर्ष निकालना पाठकों का काम है कि मेरी साहित्यिक कोशिशें किस हद तक सफल हुई हैं। मेरे नज़दीक जो बात महत्त्वपूर्ण है, वह यह है कि मैं उस रचनात्मक भाव की अभिव्यक्ति करता हूँ जिसका मैं एक माध्यम हूँ। इससे भाव, स्रोत कभी शुष्क नहीं हो सकता, यह हमेशा बहता रहता है, क्योंकि यह ईश्वरीय देन है। हम जिस प्रकार के सागर का गुणगाण करना चाहते हैं, वह असीम है। बस जीवन ही इतना थोड़ा है कि हम हैरान और परेशान रह जाते हैं। इस ख़्याल को मैंने अपने एक शे'र में यूँ कहा है हम ारी तामीरे आरज़ू की हसीन दुनिया नहीं मुकम्मल अभी तो खेंची हैं कुछ लकीरें, अभी तो खाके बना रहे हैं

यह खुशी की बात है कि उनके उत्तराधिकारी संत राजिन्दर सिंह जी महाराज देश-देश उनके इस संदेश को पहुँचा रहे हैं और दर्शन की आरज़ू के निर्माण में संलग्न हैं।

- आबिद हुसैन हैदरी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

शुभ चिंतकों से फोन पर बात करें। जो व्यक्ति सामने आता है उसे अपना दुःख न बताने लगें। लोग आप की तकलीफें सुन कर आप का मजाक उड़ाने लगते हैं। आप की बातों को बढ़ा चढ़ा कर दूसरों से कहते हैं और आप की तकलीफ के मजे लेते हैं। पड़ोसी से भी अच्छे संबन्ध रहें। पड़ोसी से अच्छे संबन्ध रखना आसान भी नहीं तो मुश्किल भी नहीं। जरूरत से ज्यादा दखलादाजी कड़वाहट भर देती है। यह नजदीकी इतनी हो कि मिठास बनी रहे। दोस्ती एक महान रिश्ता है। ये ऐसा रिश्ता है जिसे हम चुनते हैं। ये रिश्ता निभे तो वर्षोंवर्ष निभता चला जाए, टूटे तो जरा सी ठेस ही काफी है। दोस्ती अर्थात उसे हम पसंद करते हैं। एक दूसरे की गरिमा और सम्मान का पूरा पूरा ध्यान रखें। समय प्रबन्धन और सहकर्मी

दिन का बड़ा हिस्सा हम साथी कर्मचारियो के साथ बिताते हैं। ये संबन्ध मानसिक शांति और व्यक्तिगत जीवन पर प्रभाव डालते हैं। हर कदम हमें फूंक फूंक कर रखना पड़ता है। व्यवहार भी सावधानी से करना है। किसी की व्यक्तिगत जिंदगी में दखल न दें। दूसरों से अपने बारे कम से कम बातें करें। किसी की निन्दा चुगली न करें। अपने काम पर

### अंतरीक बल

ध्यान रखें। दुसरा कुछ भी करता हैं उसे मत देखो। यह काम आप के सीनियर्स का है। जान बूझ कर गलती न करें अनजाने में गलती होने पर माफी मिल जाती है। किसी के बारे कोई कमेंट न करें। बॉस की कभी निन्दा न करें। यही नियम आध्यात्मिक संस्थाओ के हेड्स के प्रति भी लागू होता है। इस से आप का समय बचेगा। आप सारी जिंदगी चेन से जियेंगें। प्रत्येक व्यक्ति सम्मान की अपेक्षा रखता है। इसलिए सम्बन्धों को बढ़िया बनानें के लिये सम्मान की भावनाए बनाए रखें। शक्की न बने इस से कुछ हासिल नहीं होता। किसी भी सहकर्मी के प्रति कभी भी अपशब्द न बोलें, वह चाहे गलत हो। अगर आप सम्मान करेंगे तो सामने वाला भी आप का सम्मान करेगा। जब भी समय मिले चाहे वह सेकेंड का ही क्यूं न हो उनके साथ जरूर बिताएं। इस बात का रोना न रोये कि आप के लिए समय नहीं था। इस बात को दिमाग से निकाल दें कि दूसरा बिना बोले आप की बात को समझ जाएगा। मन की बात मन में रखते रखते नासूर बन जाती है। कभी भी किसी के प्रति मन में नकारात्मक विचार न रखें जरूरत पड़ने पर अपनी तरफ से पहल करने में कभी झिझके नहीं ।

वर्तमान समय प्रत्येक व्यक्ति किसी दूसरे के कारण तनाव में है, संघर्ष में है, सदमे में है, लड़ाई झगड़े में फंसा हुआ है, जिस के कारण धन बर्बाद हो रहा है और हरेक मनुष्य का समय अच्छे कार्यो में नहीं लग रहा है। प्रत्येक मनुष्य प्यार चाहता है। संसार में जितनी भी समस्याए हैं उनका मूल कारण प्यार की कमी है। हमारा जन्म ही प्यार के कारण हुआ है। इसलिए प्रत्येक व्यक्ति प्यार चाहता है। प्यार कब और कैसे हो जाता है पता नहीं चलता है। इसका अहसास होना शुरू हो जाता है। प्यार दिखता नहीं। प्यार बहुत नाजुक होता है। छोटी छोटी बातें प्यार को गहरा बना देती हैं। छोटी छोटी बातों से यह टूट भी जाता हैं। प्यार की कोई सीमा नहीं होती। प्यार बिना शर्त होता हैं। प्यार बनाए रखना बहुत मुश्किल है। इस का सही प्रबन्धन ना हो तो बहुत समय नष्ट होता है। प्यार कब खत्म हो जाता है पता ही नहीं चलता। जिस से स्नेह है उस पर बन्धन नहीं डालना चाहिए ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

२. प्रात:विधी - (स.६.३० ते ७.००.) :

बाळाशी सुसंवाद साधल्यानंतर दात घासावेत. त्यानंतर १ ग्लासभर पाण्यात १/२ लिंबू पिळून ते पाणी प्यावे; यामुळे शौचास साफ होते. गर्भवतींमध्ये मलावस्तंभाची तक्रार राहत नाही, थंडी असेल तर लिंबू पाण्यासाठी पाणी कोमट करून घ्यावे.

३. नाष्टा (७.०० ते ७.३० वा.) :

नाचणीचा १ लाडू व ४-५ काळे खजूर खावेत. सकाळच्या वेळी कोरडे पदार्थ खाल्ले म्हणजे रात्रभर साचलेले पित्त उलटीवाटे बाहेर पडत नाही, तर ते हे पदार्थ पचविण्याच्या कामी येते व थोडे खाल्ल्यामुळे गर्भवतीचा थकवा जाऊन उत्साह येतो. उरलेल्या वेळेत तुमची इतर हलकी कामे करून घ्यावीत किंवा पेपर वाचन करावे.

४. व्यायाम (८.०० ते ८.३०) : नाष्ट्यानंतर अर्ध्या तासाने व्यायाम करावा. दीर्घश्वसन, प्राणायाम, योगासने किंवा चालण्याचा हलकासा व्यायाम करावा. व्यायामामुळे स्नायू लवचीक व बळकट होतात. तसेच प्राणायाम, दीर्घश्वसनामुळे फुफ्फुसांमध्ये प्रसूतीच्या वेळेस श्वास रोखून ठेवून कळ घेण्यासाठी लागणारी क्षमता तयार होते. व्यायाम व प्राणायामामुळे सुलभ

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

नैसर्गिक प्रसूतीचे प्रमाण वाढते. फक्त डॉक्टरांच्या सल्ल्याने व्यायाम करावा. रोज नियमितपणे व्यायाम केला, तर त्याचा प्रसूतीच्या वेळेस नक्कीच उपयोग होतो. व्यायाम प्रकरणामध्ये आपण याबद्दलची पूर्ण माहिती सांगितलेली आहे.

५. स्नान (८.३० ते ९.०० वा.) :

वातशामक तेल अंगाला हलक्या हाताने खालून वरच्या दिशेने लावावे. तेल अंगात जिरल्यानंतर ऋतुनुसार गरम किंवा कोमट पाण्याने अंघोळ करावी. गर्भावस्थेमध्ये त्वचेचे सौंदर्य राखण्यासाठी शक्यतो साबण लावून अंघोळ करू नये, कारण साबणाने त्वचा रुक्ष व कोरडी होते; म्हणून आयुर्वेदिक उटणे दुधात भिजवून लावावे. यासाठी आम्ही आयुर्वेदिक बेबी बाथ, उटणे बनविलेले आहे, त्याचा वापर करावा. स्नान झाल्यावर स्वच्छ फिक्या रंगाचे कपडे असावेत. उटणे लावल्यामुळे त्वचा नितळ, कांतीमय होते. स्नान करताना योनीमार्गाची व स्तनांची स्वच्छता करावी. स्तनाग्रे आतमध्ये असतील तर ती पुढे ओढावीत; त्यामुळे पुढे बाळाला दूध ओढण्यास त्रास होत नाही. स्नान केल्यावर मन प्रसन्न व आनंदित होते. मनाला ताजेतवाने वाटते. स्नानानंतर परमेश्वराचे नामःस्मरण करावे.

६. दूध पिणे (९.०० वा.) : .

१ ग्लासभर दूध शतावरीकल्प टाकून घ्यावे. काही गर्भवती स्त्रियांना सकाळी चहा प्यायची सवय असते, अशा वेळी शक्यतो आयुर्वेदिक तुळसयुक्त गवती चहा द्यावा. तो आरोग्याला चांगला असतो. चहा पावडर टाकून बनविलेला चहा पिण्यास टाळावे; त्यामुळे पित्त वाढून जळजळ होणे, उलटी होणे ही लक्षणे वाढतात. कुठलेही पेय किंवा दूध गर्भवतीने एकदम पिऊ नये. शांतपणे पेयाचा घोट घोट आस्वाद घेत प्यावे; त्यामुळे उलटी होत नाही.

७. पूजा-अर्चा (९.१० वा.) :

परमेश्वराचे चिंतन करावे. पूजा करावी. जपमाळेवर स्तोत्र किंवा एखादा मंत्र जपावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# गुरु भक्ति द्वारे प्रभु भक्तिचा 'राजमार्ग'



नगर – सद्‌गुरुंचे मनुष्य जीवनामध्ये सर्वोच्च स्थान आहे. साधारण मानव जीवन व परमात्मा यांना जोडणारा महत्वपूर्ण दुवा म्हणजे सद्‌गुरु होय. आनंदधाम येथे १९ व्या शतकातील अशा दोन महान गुरुवर्यांचा दीक्षा जयंती महोत्सव त्रि–दिवसीय धार्मिक कार्यक्रमांद्वारे साजरा करण्यात येत आहे.

आजच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या गुरु गुणानुवाद सभेची सुरुवात भगवान महावीर स्वामींच्या अद्वितीय गुणानुपर श्री पुच्छिस्सुणं स्तोत्र, श्री महावीराष्टक स्तोत्र तसेच जिनेश्वर भगवंतांच्या स्तुति युक्त स्तोत्रांद्वारे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा., प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा. इत्यादी साधु – साध्वीजींच्या पावन सानिध्यात संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म.सा. यांच्या मुखरविंदांने झाली.

श्री श्रेयलश्रीजी म.सा. नी असली परिस कोण आहेत? या विषयावर प्रवचन दिले. त्यांनी सांगितले की, देव – गुरु – धर्म हेच खरे परिस आहेत कारण यांच्या सानिध्याने, सत्संगतीमुळे मानव जीवनाचे सोने होते व ते झळाळून निघते. म्हणून धर्माची शरण घेऊन जीवन सार्थक केले पाहिजे.

श्री आलोकऋषिजी म.सा. यांनी आपल्या प्रवचनात आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म सा. चे गुण वर्णन केले की, आचार्य भगवंत जेव्हा जिनस्तुति करत होते तेव्हा हजारों श्रध्दाळू भाविक उपस्थित राहून जिनस्तुतिचा आनंद घेत असत. भगवंताची स्तुती आत्मकल्याणासाठी अत्यंत महत्वपूर्ण व लाभकारी सिद्ध आहे.

ज्यांनी राग, द्वेष, मोह, मत्सर इत्यादी आंतरिक रिपुंना जिंकून मोक्ष प्राप्ति केली आहे, अशा जिनेश्वर भगवंताच्या भक्ति चा राजमार्ग सद्‌गुरुच्या श्रध्दा – भक्तित आहे.

दीक्षा जयंती महोत्सव व मौन ग्यारस, हा दुग्ध शर्करा योग असलेला उद्याचा दिवस जाप – प्रवचन, साधना – आराधना द्वारे साजरा करण्यात येणार आहे. जैन धर्मातील तीर्थंकरांचे प्रत्येकी च्यवन, जन्म, दीक्षा, केवलज्ञान व निर्वाण, हे पाच कल्याणक नियमतः असतात. मौन ग्यारस या दिवशी विविध तीर्थंकरांचे विविध असे १५० कल्याणक या दिवशी झाले असल्यामुळे मौन ग्यारस हा दिवस पुण्यार्जनासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. आज आनंद समशरण आनंद येथे जवळपास ५०० श्रावक श्राविकांच्या उपस्थितीमध्ये पोषक दया शेकडोंच्या संख्येने झाली. मधुर व्याख्याता श्री आभाश्रीजी महाराजांनी मौन साधनेचे महत्त्व सांगितले. श्री आलो ऋषिजी महाराजांनी सांगितले – बोलणं चांदी आहे तर, मौन राहणं सोन आहे. महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा. व प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाने आनंद समवशरणात तीन दिवसीय कार्यक्रम सुंदररित्या झाले. तीर्थंकर श्री पार्श्वनाथ भगवान तसेच नूतन वर्षाच्या दोन्ही महत्त्वपूर्ण कार्यक्रमांमध्ये सर्व भाविक जणांनी जास्तीत जास्त संख्येमध्ये उपस्थित रहावे, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन स्थानक धार्मिक परीक्षा बोर्ड, अहमदनगर, यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# नगरमधील खेळाडू नयना खेडकर हिने चीनमध्ये कुंगफूत पटकाविले सुवर्ण पदक



चीनमध्ये कुंगफूत सुवर्णपदक पटकाविणारी नयना खेडकर इतर खेळाडूंसह दिसत आहे.

नगर – चीनमध्ये डुंगफुंग शहरात झालेल्या माउंट सोंगशान वुशू स्पर्धेत नगरची खेळाडू नयना खेडकर हिने कुंगफू मध्ये सुवर्ण पदक पटकाविले. या आंतरशालेय स्पर्धेत खेडकर हिने युनताई माउंटन इंटरनॅशनल स्कूलचे प्रतिनिधित्व करुन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

पाच दिवसीय या स्पर्धेत थाई आणि कुंगफूची स्पर्धा रंगली होती. या स्पर्धेत विविध देशातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. नयना खेडकर या मुळच्या नगर शहरातील असून, त्या सध्या चीनमध्ये युनताई माउंटन इंटरनॅशनल कल्चर आणि मार्शल आर्ट्स स्कूलमध्ये थाई व कुंगफू या, सँडाचा सराव करत आहे. त्यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन विजेतेपद पटकाविले.

खेडकर या आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू म्हणून यशस्वी वाटचाल करत आहेत. सध्या गृहिणी असलेल्या लता खेडकर आणि निवृत्त पोलिस अधिकारी कै. निवृत्ती (एन.डी.) खेडकर यांच्या कन्या आहेत.

यापूर्वी देखील मध्य चीनच्या हेनान प्रांतातील झेंगझोऊ या शहरामध्ये झालेल्या तेराव्या झेंग्झू आंतरराष्ट्रीय शाओलिन वुशू महोत्सवात खेडकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करत कुंगफू मध्ये रौप्य पदक पटकाविले होते.



जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) अहमदनगर शाखेच्या वतीने जितो अहमदनगर प्रिमियर लीग ३.० क्रिकेट स्पर्धेचे टि शर्टचे अनावरण नुकतेच करण्यात आले.

# अहिल्यानगर शहरात १५ डिसेंबर रोजी होणार जितो अहमदनगर प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धा

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) अहमदनगर शाखेच्या वतीने १५ डिसेंबर रोजी जितो अहमदनगर प्रिमियर लीग ३.० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. साईनगर टर्फ येथे सदर स्पर्धा होणार आहेत. यासाठी संघाची निवड व टि शर्टचे अनावरण नुकतेच करण्यात आले.

ट्रॉफी व टि शर्ट अनावरण परेश लोढा, पुणित भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. जितो अहमदनगरचे संस्थापक चेअरमन गौतम मुनोत, माजी चेअरमन अमित मुथा, रेस्ट ऑफ महाराष्ट्रचे युथ कन्व्हेनर गौतम मुथा, माजी चेअरमन जवाहर मुथा, व्हाईस चेअरमन विजय गुगळे, अमित पोखर्णा, सेक्रेटरी तुषार कर्नावट, सुमंगला मुनोत, पारस चुडीवाल, प्रितेश दुग्गड, खजिनदार दिनेश ओस्तवाल, खुशबू मुनोत, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी तसेच सर्व टीम ओनर्स आदींसह सदस्य उपस्थित होते.

स्पर्धेची अधिक माहिती देताना चेतन भंडारी यांनी सांगितले, एकूण ११ संघ स्पर्धेत खेळणार आहेत. यात ८ मुख्य संघ व ८ ते १२ वर्ष वयोगटातील ३ मुलांच्या संघाचा समावेश आहे. विशेष म्हणजे प्रत्येक संघात युवा आणि महिलांचाही समावेश असून सगळ्यांना एकत्रित येऊन क्रिकेटचा निखळ आनंद घेता येईल. स्पर्धेत पोखरणा गोल्ड डायनेस्टी, एमआरएम टायटन्स, एव्हिओथिक, गुगळे स्मॅशर्स, कीर्ती ११, ब्ल्यू फिनिशर्स, नमोह ९९, साईदीप हिरोज सह मुलांचे अर्थ ७, व्हेंजर्स, ए.एम. वारियर्स या संघांचा समावेश आहे. कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत खुशबू मुनोत यांनी केले.

संघ ऑक्शनचे सूत्रसंचालन व नियोजन चिराग शेटिया यांनी केले. युथ विंग सेक्रेटरी यश भंडारी यांनी आभार मानले.

# भारतरत्न मौलाना आझाद जयंती निमित्तच्या चित्रकला आणि निबंध स्पर्धांचे बक्षीस वितरण



स्वतंत्रतासेनानी भारतरत्न मौलाना आजाद जयंतीनिमित्त चित्रकला, निबंध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

नगर – मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व मराठा सेवा संघाच्या वतीने स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय शिक्षण दिनी राष्ट्रीय एकता सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय शिक्षण दिनाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर यांनी विद्यार्थ्यांना भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे जीवन व सेवा यांची माहिती दिली. व त्यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांमध्ये निबंध लेखन आणि चित्रकला स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या होत्या, त्यात मुलांनी मौलाना आझाद यांच्यावर आपले विचार मांडले. सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्यिक पुस्तके वह्यांसह बक्षिसे देण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या अप्रतिम कार्यक्रमातून मुलांना मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या शैक्षणिक सेवा आणि राष्ट्र उभारणीबद्दल मौल्यवान माहिती मिळाली.

यावेळी घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत जिल्हा परिषद उर्दू स्कूल केडगावच्या विधार्थीनींनी पहिला क्रमांक विभागुन नाझिया उबेदुर्रहेमान व अरबीश मुस्तकीम अहमद शेख, दुसरा आयशा अब्दुल रहमान खान, तीसरा सादेका उबेदूर्रहेमान खान, तर महात्मा गांधी उर्दू स्कूल अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्डच्या विद्यार्थी प्रथम शेख असद तन्वीर, द्वितीय पटेल नमीरा इमरान, तृतीय उम्मेहानी समीर कुरेशी यांनी तर अहमदनगर महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ११ व १३ मधील विद्यार्थी प्रथम मदारी नाझिया असलम, द्वतीय अन्सारी अल्तमश नसीम, तृतीय सुकृती यादव यांनी जिंकले.

निबंध स्पर्धेत मातोश्री उर्दू हायस्कूल आलमगीरच्या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक शेख आमेना अश्फाक, द्वितीय शेख जिया जावेद व महात्मा गांधी उर्दू स्कूल अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्डाचे प्रथम शेख असद तन्वीर, द्वितीय सदफ जमील शेख, तृतीय शेख सोफिया नईम यांनी क्रमांक पटकावले.

संपूर्ण सप्ताहास हाजी शौकतभाई तांबोळी, प्राचार्य खालीद जहागीरदार, मराठा सेवा संघाचे महानगराध्यक्ष अभिजीत वाघ, तन्वीर चष्मावाला, सहेली ग्रुप, वसीम ज्वेलर्स, न्यू मॉडर्न कन्स्ट्रक्शन, रहमत सुलतान फाउंडेशन, मोहंमदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, शरफुद्दीन सर, डॉ.जहीर मुजावर, एफ. एन.ट्रेडर्स, चेडे हॉस्पिटल, युनूसभाई तांबटकर, जावेद तांबोळी, असिफ सर, एहसान शेख, डॉ.रिजवान शब्बीर, रिलायबल कॉलेज, अलकरम हॉस्पिटल, शफी हज टुर्स, इंडिया बेकर्स, फैयाज सर, हमजा अली, हनीफ सर आदींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील यांनी पूर्ण सप्ताहमध्ये राबविलेल्या सर्व उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तर आभार निसार बागवान यांनी मानले.





भारतीय सेनेची २२ मराठा लाईट इन्फंट्री (हैद्राबाद) बटालियनचा हिली डे निमित्त गेट टुगेदर कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# भारतीय सेनेच्या २२ मराठा लाईट इन्फंट्री (हैद्राबाद) बटालियनचा हिली डे निमित्त गेट टुगेदर कार्यक्रम

नगर – साई रिसॉर्ट, पिंपळगाव मळवी येथे ८ डिसेंबर रोजी भारतीय सेनेच्या २२ मराठा लाईट इन्फंट्री (हैद्राबाद) बटालियनचे हिली डे निमित्त रिटायर ऑफिसर, ज्युनिअर कमिशन ऑफिसर, जवान, ७१ वार हिरो व त्यांचे परिवार एकत्र येऊन गेट टुगेदर कार्यक्रम साजरा केला.

प्रथम दीपप्रज्वलन करून ७१ च्या लढाई मध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रम सुरू झाला.

कार्यक्रमासाठी कर्नल एस एस नांगरे, कर्नल सोमेश्वर गायकवाड, आ/कॅप्टन शेख बुढण, आ/कॅप्टन शेख बशीर, आ/कॅप्टन के के पठाण, आ/सुबेदार मेजर नारायण झिने, सुबेदार माणिक शिंदे, सुबेदार शरीफ, सुबेदार मेजर दिनकर तांदळे, सुबेदार शेख बहादूर पटेल, हवालदार शिवाजी लोंढे, हवालदार रतन साके, हवलदार आबा मूलक, हवालदार मोहन म्हस्के, दिलीप काकडे, बाळासाहेब यादव, सुरेश मोटे, कैलास काळे, बबन नाईक, नाना दरेकर, राजू ठोकळ, दिनकर जाधव, बहुद्दिन शेख, शेख अहमद, मणियार, धनायेत, सचिन पवार, लतिफ इनामदार आदि सैनिक व त्यांचे परिवार उपस्थित होते.

# 'विश्वसन्मान जीवन गौरव महासन्माना'ने केडगावचे मठाधिपती अशोक जाधव सन्मानित



केडगावचे मठाधिपती अशोक जाधव यांना साधू, संत महतांच्या उपस्थितीत 'विश्वसन्मान जीवन गौरव महासन्माना'ने पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

नगर – केडगाव येथील श्रीमंत सद्‌गुरु शंकर शेठ महाराज मठाचे मठाधिपती अशोक (दादा) जाधव यांना विश्वसन्मान जीवन गौरव महासन्मान पुरस्कार व तसेच राष्ट्रीय धर्मगुरु पद प्रदान करण्यात आले.

श्री क्षेत्र संगमेश्वर, ता. मुरबाड (जि. ठाणे) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय विराट संत संमेलनामध्ये १११ साधू संत महंताच्या उपस्थितीमध्ये जाधव यांचा सन्मान झाला.

अशोक (दादा) जाधव यांच्या धार्मिक, अध्यात्म सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी अनापवाडी शाळेचे मुख्याध्यापक सागर घोलप, बाळासाहेब रासकर, कृष्णा उरणकर, नानासाहेब कर्डीले, विशाल पवार उपस्थित होते.



साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ लॉ कॉलेजच्यावतीने आयोजित संविधान दिवस कार्यक्रमात बोलताना न्यायमूर्ती भाग्यश्री पाटील.

# महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक

## न्यायमूर्ती भाग्यश्री पाटील यांचे प्रतिपादन

नगर – सर्व समाजाचे सक्षमीकरण करावयाचे असेल तर प्रथम महिलांचे आणि विशेषतः तळागाळातल्या महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन न्यायमूर्ती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ लॉ कॉलेजच्यावतीने आयोजित संविधान दिवस कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. भारतीय संविधानाचे महत्व अधोरेखित करतांना त्यांनी अनेक उदाहरणाचा समावेश केला. जिल्हा विधी सेवा प्राधीकरणाच्या सचिव या नात्याने प्राधिकरणाचे महत्वही त्यांनी यावेळी विषद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध आडसुळ हे होते. सदर कार्यक्रमात मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायाधिश आर. एस. रोटे यांनीही भारतीय संविधानाचे मार्मीक विश्लेषण करून कायदेविषयक मोफत मार्गदर्शन व सल्ला मिळवण्यासाठी उपलब्ध सुविधांबद्दल उपस्थितांना अवगत केले. सायबर गुन्हे व त्याबाबत आवश्यक असणारी सामाजिक सतर्कता या विषयावर सायबर क्राईम चे पोलिस उपनिरीक्षक चेहर व पोलीस नाईक अभिजीत अरकल यांनी सोदाहरण माहिती देऊन जणजागृती केली.

कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राचार्य रियाज बेग यांनी केले सूत्रसंचालन क्रांती बागुल यांचे समवेत विद्यार्थी सिद्धेश रोडे व शुभांगी जमदाडे यांनी केले. भारतीय संविधानाच्या प्रस्तावणेचे वाचन राजश्री कातकडे हिचेसमवेत सर्व उपस्थितांनी केले. सपना छिंदम यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे चेअरमन प्रा.अनिरुद्ध आडसुळ, संस्थेचे सचिव लीना आडसुळ, संस्थेचे संचालक कृष्णा आडसुळ, संचालक व प्राचार्य डॉ. पाटील, संचालक व प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, प्राचार्य डॉ.गडाख, प्राचार्य डॉ.लांडगे, प्राचार्य डॉ. पंडित, प्राचार्य डॉ. वायाळ, प्राचार्य डॉ. रियाज बेग, प्रा. क्रांती बागुल, प्रा. श्रुती हालदार, प्रा. गायकवाड, इतर शिक्षक व शिक्षेकितर कर्मचारी तसेच आडसुळ शैक्षणक संकुल मधली सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते

# छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार २०२४ जाहीर

## ९७ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते साहित्य पुरस्काराचे होणार वितरण



गितेश शिंदे | डॉ.महादेव अक्कोळे | देवा झिंजाड | दिपाली दातार | महादेव माने | डॉ.जोतीराम पवार | श्रीकांत लगड

नगर – देशाच्या स्वातंत्र्यासाठी मराठी अस्मितेसाठी मराठी रयतेसाठी ब्रिटिशां विरुद्ध एकाकी झुंज देऊन करवीर संस्थांचे छत्रपती चौथे शिवाजी महाराज अहमदनगर येथे हुतात्मा झाले. त्यांची स्मृती चिरंतन राहावी म्हणून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार यांच्या वतीने छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या नावे दरवर्षी राज्य साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी दिली.



हुतात्मा छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून हे पुरस्कार दरवर्षी २५ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात येतात. पुरस्काराचे हे सहावे वर्ष आहे. यावर्षीचे पुरस्कार निवड समितीने परीक्षण करून जाहीर केले आहेत. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने जिल्हाभर शिक्षण प्रसार करून ज्ञानगंगा प्रवाहित केली. संस्थेची विद्यालय व महाविद्यालय ग्रामीण भागात विद्याप्रसार करताना विद्यार्थ्यांना लागणाऱ्या दैनंदिन वस्तू व गरजा भागविण्यासाठी संस्थेने सहकारी ग्राहक भांडाराची स्थापना केली. अशा या भांडाराची वाटचाल यशस्वीरित्या चालू आहे. या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराच्या वतीने संस्थेचे प्रेरणास्थान असलेले हुतात्मा करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या नावे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार देण्यात येतात. त्या पुरस्कारांचा प्रदान सोहळा २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता राजर्षी शाहू महाराज सभागृह न्यू आर्ट्स कॉलेज मध्ये होणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव तथा ग्राहक भांडाराचे सभापती

अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील यांनी दिली. सदर कार्यक्रमास साहित्यिक, प्रकाशक, ग्रंथवितरक आणि साहित्य रसिकांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या वर्षीचे छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार २०२४ ठाणे येथील गितेश गजानन शिंदे यांच्या सीसीटीव्हीच्या गर्द छायेत (कविता संग्रह), जयसिंगपूर येथील डॉ. महावीर रायाप्पा अक्कोळे यांच्या संतांचा तो संग नव्हे भलतैसा (धार्मिक, संत साहित्य), पुणे येथील देवा गोपीनाथ झिंजाड यांच्या एक भाकर तीन चुली (कादंबरी) तसेच पुणे येथील दिपाली मुकुंद दातार यांच्या पैस प्रतिभेचा (वैचारिक), सांगली येथील महादेव तुकाराम माने यांच्या वसप (कथा संग्रह) या साहित्य कृतींना राज्य साहित्य पुरस्कार देण्यात येत आहेत. तसेच कोल्हापूर येथील प्राचार्य डॉ. जोतीराम कृष्णराव पवार यांच्या राजर्षी शाहूंची वाडमःयीन स्मारके (संपादित, ऐतिहासिक ग्रंथ) या साहित्यकृतीला विशेष राज्य साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. त्याचबरोबर जिल्हास्तरावरील जिल्हा साहित्य पुरस्कार श्रीकांत नारायण लगड यांच्या उमंग (चरित्र) या ग्रंथास जाहीर केला आहे. संस्थेतील लेखक, साहित्यिक डॉ. रामदास टेकाळे यांचा साहित्य गौरव करण्यात येणार आहे. असे पुरस्कार निवड समितीच्या वतीने पुरस्कार निवड समितीचे कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत यांनी छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्काराची घोषणा केली.

यावेळी अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, भांडाराचे सभापती व संस्थेचे सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, चेअरमन दत्ता पाटील नारळे, व्हाईस चेअरमन विजय जाधव, श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारचे सर्व पदाधिकारी व पुरस्कार निवड समिती सदस्य प्राचार्य डॉ.एम.एम. तांबे, डॉ. बापू चंदनशिवे, डॉ. वैशाली भालसिंग, डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, लेखक रंगनाथ भापकर, व्यवस्थापक भाऊसाहेब पवार, पुरस्कार समिती समन्वयक प्रा. गणेश भगत आदी उपस्थित होते.

# ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदानच्या मागणीसाठी नगर शहरात निदर्शने

नगर – लोकशाही व देश वाचविण्यासाठी ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे, अदानी कंपनी समूहाच्या आर्थिक घोटाळ्याची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशी व्हावी, अदानी समुहाला पाठिशी घालणाऱ्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी व मणिपूर राज्यातील हिंसाचाराला लगाम लावून शांतता प्रस्थापित करण्याच्या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जागतिक मानव अधिकार दिनानिमित्त निदर्शने करण्यात आले.

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करुन आंदोलन करण्यात आले. ईव्हीएम हटाव देश बचाव!... च्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. या आंदोलनात भाकपचे राज्य सचिव कॉ.ॲड. सुभाष लांडे, कॉ. ॲड. बन्सी सातपुते, कॉ.ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संजय नांगरे, आर्किटेक्ट अर्शद शेख, कॉ. रमेश नागवडे, शहराध्यक्ष कॉ. फिरोज शेख, नंदू उमाप, भगवान गायकवाड, बापू राशिनकर, महिला फेडरेशनच्या कॉ. भारती न्यालपेल्ली, राजू शेख, कॉ. सतीश पवार, संगीता कोंडा, गनी शेख, संदीप इथापे, बापूसाहेब अढागळे, बाबासाहेब सोनूपुरे, सुलाबाई आदमाने, शोभा बिमन, शारदा बोगा, लक्ष्मीबाई कोटा, कमलाबाई दोंता, सुभाष शिंदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे या मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने जागतिक मानव अधिकार दिनानिमित्त निदर्शने करण्यात आली.

घेण्यात यावी अशी मागणी सर्वत्र होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अदानी कॉर्पोरेटद्वारा शेअर मार्केटमध्ये गैर मार्गाने केलेले व्यवहार हिडेनबर्ग प्रकरणातून उघडकीस आले आहे. भारतीय शेअर मार्केटचे नियंत्रण करणाऱ्या सेबीची संशयास्पद भूमिका उजेडात आली आहे. मात्र याबद्दल भाजपच्या मोदी सरकारने पूर्णतः अदानी कार्पोरेटची पाठराखण केली आहे. नरेंद्र मोदी सरकारचे सौर ऊर्जेबाबतचे धोरण संपूर्णतः आदानी कॉर्पेटच्या फायद्यासाठी रचण्यात आले आहे. अदानी यांच्या सौर ऊर्जेच्या उत्पादनांना धंदा मिळावा यासाठी गैरमार्गाने नियम बनविण्यात आले आहे. नाव शेतकरी व जनतेचे आणि धंदा मात्र फक्त आदानीचा होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अदानी प्रकरणी अमेरिकेतील न्यायालयात खटला सुरू करण्यात आला असून, त्याच्या पुतण्यावर समन्स जारी करण्यात आला आहे. यामुळे भारत सरकारच्या कार्यपद्धतीचे धिंडवडे निघाले आहेत. याबद्दल पारदर्शकपणे चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती नेमण्याची मागणी भाकप व सर्व विरोधी पक्ष करीत आहे. कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणामुळे देशाची अर्थव्यवस्था धोक्यात आलेली असल्याचेड. ॲड. कॉ. सुभाष लांडे यांनी सांगितले.

## मणिपूरचा हिंसाचार थांबविण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलावे

भारतातील मणिपूर मध्ये मे २०२३ मध्ये हिंसाचाराचा उद्रेक झालेला असून, दिवसंदिवस या भागातील अत्याचारामध्ये वाढ होत चालली आहे. या हिंसाचारामुळे सुमारे ६० हजार पेक्षा जास्त लोक निर्वासित छावण्यात राहत आहे. दररोज घडत असलेल्या हिंसाचारात हजारापेक्षा जास्त नागरिकांना आपला जीव गमावा लागत आहे. मणिपूर राज्याचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे. त्याच्या पक्षपाती व्यवहारामुळे राज्यात हिंसाचार व अशांतता पसरली आहे. जनतेचा विश्वास गमवलेल्या मुख्यमंत्री यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे. अशांततेच्या आगीत मणिपूर होरपळले जात असताना, देशाच्या पंतप्रधानांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. ज्यांची घरे जाळण्यात आली, हिंसाचारात मृत्यू झालेल्या कुटुंबाला केंद्र सरकारने जाहीर केलेली मदत देखील दिलेली नसल्याचा संताप भाकपच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

ईव्हीएम बाबत देशातील मतदार नागरिकांच्या मनात संशय व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएम बाबत हजारो तक्रारी आल्या असून, अनेक शंका उपस्थित केल्या जात आहे. त्यामुळे मतपत्रिकेवर मतदान

मणिपूरच्या मुख्यमंत्री यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, मणिपूर राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करावी, हिंसाचारग्रस्त कुटुंबांना तात्काळ मदत द्यावी, अदानी कार्पोरेटचा शेअर घोटाळा, सौर ऊर्जा घोटाळ्याबद्दल संयुक्त संसदीय समिती स्थापन करून चौकशी व्हावी, सेबीचे अध्यक्षांची हकालपट्टी करावी, मंत्रालय आणि प्रशासनातील अदानीच्या दलालांना अटक करावी, कोसळत असलेल्या जीडीपी आणि वाढत्या बेरोजगारी बद्दल उपाययोजना करावी व ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली आहे.

# चास ओढ्यातील गुरुदत्त मंदिरात १४ डिसेंबर रोजी दत्त जयंती उत्सव



नगर – नगर पुणे रोडवरील ओढ्यातील गुरुदत्त मंदिर, गोंडाळ मळा, चास येथे दत्त जयंती निम्मित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. केडगावच्या पुढे असलेले हे मंदिर पुरातन क्षेत्र असून ओढ्यात असून दोन्ही बाजूने डोंगर आहे व मध्ये दत्तक्षेत्र आहे. त्यामुळे मंदिराला ओढ्यातील दत्त मंदिर असे नाव पडले आहे. मंदिराच्या मागे बंद खदान असून तिथे तळे निर्माण झालेले आहे, त्यामुळे हे धार्मिक बरोबर पर्यटन स्थळ देखील आहे, नगर–पुणे रोडवरील प्रवासी, कुटुंब शेकडो वर्षांपासून येथे दर्शनासाठी व विश्रांतीसाठी येथे थांबतात, दर गुरुवारी रात्री आरतीसाठी नगरकर व परिसरातील भाविक येथे येतात.

उत्सवा निमित्त गुरुचरित्र पारायण सोहळा सुरु झाला असून तो १४ डिसेंबर पर्यंत होणार असून दत्त जयंतीला १४ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १२ पर्यंत श्रीं दत्तगुरूंचा महाअभिषेक सोहळा, नंतर दुपारी १२ ते ३ भजन कार्यक्रम व सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्रसाद महाराज देव, शांतीब्रम्हे श्री एकनाथ महाराज यांचे एकनिष्ठ भक्त नरहर सिद्ध (दादास्वामी) यांचे १३ वे वंशज यांच्या मधुर वानिने श्री दत्त संगीत जन्म कथा व दत्त नामाचा नामजप होऊन सायंकाळी ठीक ६ वाजता श्रींचा पाळणा होऊन दत्त जन्म उत्सव साजरा होईल. दत्त जन्म झाल्यानंतर सायं ७ ते ९ भजन होईल. तसेच दिवसभर साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद वाटप होणार आहे.

१५ डिसेंबर ला दुपारी १२ वाजल्या पासून सायंकाळी ५ वाजे पर्यंत महाप्रसाद होणार आहे. तरी नगर पुणे रोड वरील गुरुदत्त मंदिर, गोंडाळ वस्ती, चास, अहिल्यानगर येथे सर्व कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाविक, भक्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमासाठी शहरांसह राज्यातून भाविक, भक्त दरवर्षी येथे येतात, सकाळपासून ते रात्रीपर्यंत भाविक दर्शनासाठी गर्दी करतात तसेच या ठिकाणी वर्षभर विविध उत्सव साजरे केले जातात, तर दर गुरुवारी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते, मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी सर्व दत्ताचा मंदिरात जन्मोत्सव साजरा केला जातो.



पाईपलाईन रोड येथील किसनगिरीनगर मधील गुरुदत्त भक्तिधाम दत्त मंदिर

# संत किसनगिरी नगर शहरात शनिवारी श्री दत्त जयंती महोत्सव

नगर – सावेडी भागातील श्री दत्तात्रय भगवान व श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबांच्या कृपाशीर्वादाने व भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने पाईपलाईनरोड, किसनगिरीनगर, गुरुदत्त भक्तिधाम दत्त मंदिर येथे १४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

दत्त जयंती निमित्त सकाळी ६ ते ८ अभिषेक, नित्य पूजा व आरती, सकाळी ९.३० ते ११.३० अभंगावली ग्रंथाचे पारायण. दर पौर्णिमेची महाआरती दुपारी १२ वाजता हरिपाठ दुपारी ३.३० ते ४.३०, अभंग व प्रवचन ह. भ. प.गोरक्षानथ दुतारे महाराज सायंकाळी ४.३० ते ६ नंतर श्री दत्तात्रय भगवान सोहळा. पाळणा व महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.


या दत्त जयंती महोत्सवात भाविकांनी सहभागी व्हावे, असे समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबानगर भक्त सेवा मंडळाने आवाहन केले.

# अक्कलकोट स्वामी रेखी मठात श्री दत्तजयंती महोत्सवाचे आयोजन

नगर – मार्गशीर्ष शु. १५ म्हणजेच शनिवार १४ डिसेंबर रोजी मठामध्ये सालाबादप्रमाणे श्री दत्त जयंती साजरी होणार आहे. भगवान दत्तात्रयांचा चौथा अवतार 'श्री अक्कलकोट स्वामी समर्थ यांचे मठात खांबातून नाथपंथी वेशात सौ. सखुबाई नानाजी रेखी यांना प्रत्यक्ष दर्शन झाले व स्वतः स्वामी समर्थांनी आपल्या चैतन्य पादुका श्री नानाजी बापूजी रेखी यांना पाठवून नगरला मठ स्थापनेची आज्ञा केली. अशा या पुरातन मठात श्री दत्त जयंती सोहळा साजरा होणार आहे.

यानिमित्त १३ डिसेंबर रोजी रात्री ९ ते १० शंकरमहाराज भजनी मंडळाचा कार्यक्रम होईल व १४ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता मंगल वाद्ये, सकाळी ८ वाजता वे.मू. अमोल कुलकर्णी यांच्या उपस्थितीत श्री स्वामी समर्थांना पवमान अभिषेक, सायंकाळी ५ वाजता सद्गुरू श्री कुशाभाऊ रेखी यांचे शिष्य हभप महेश बुवा कस्तुरे यांचे श्री दत्त जन्म या आखान्यावर सुश्राव्य नारदीय कीर्तन होईल. सायंकाळी ७ वाजता दत्त जन्म व पाळणा घेऊन प्रसाद वाटप होईल. कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सर्वश्री. दयानंद रेखी, अजित रेखी व योगेश रेखी यांनी केले आहे.

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थानात १७ डिसेंबरपासून पुण्यतिथी महोत्सवास होणार प्रारंभ



नगर – बालीकाश्रम रोडवरील चिंतामणी हॉस्पिटल येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थानात १७ ते २४ डिसेंबर रोजी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन केले आहे, अशी माहीती सी. बी. कुलकर्णी यांनी दिली.

दररोज सकाळी ६ ते ७ वाजता काकड आरती, साडेसात ते आठ अल्पोपहार, सकाळी ६ ते संध्याकाळी ७ वाजता १३ तास मौन व नामस्मरण, दुपारी १२ वाजता आरती व प्रसाद, दुपारी साडेतीन ते साडेपाच श्री सद्गुरुलीलामृत पोथी पारायण, रात्री आठ वाजता आरती व महाप्रसाद.

या काळात १५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ वाजता कोठी पूजन, दुपारी १२ वाजता आरती व प्रसाद, १७, १८ व १९ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १० व संध्याकाळी ६ ते ८ वाजता दासबोध व मनाचे श्लोक अभ्यास वर्गात ठाण्याचे समर्थ भक्त समीर लिमये यांचे प्रवचन २० ते २३ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते १०, संध्याकाळी ६ ते ८ वाजता ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात आळंदीचे ह. भ. प. पांडुरंग महाराज यांचे प्रवचन, २४ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीन ते साडेपाच ग्रंथ दिंडी, संध्याकाळी ६ ते ८ पुण्याचे ह. भ. प. संदीपबुवा मांडके यांचे किर्तन.

२५ डिसेंबर रोजी पहाटे ५ ते ६ वाजता श्री क्षेत्र गोंदवले येथील थेट प्रक्षेपण, सकाळी ६ वाजता श्री क्षेत्र गोंदवलेकडे प्रस्थान.






विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉनचे अहिल्यानगरला स्वागत करण्यात आले. यावेळी ॲथलेटिक क्लब, अनुभवी मॅरेथॉनर्स, शाळकरी विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, वीर नारी आणि नागरिक उपस्थित होते.

# विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉनचे अहिल्यानगरला स्वागत

नगर – भारतीय लष्कराच्या मुख्यालय दक्षिण कमांडच्या नेतृत्वाखाली आयोजित 'विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉन'मध्ये सहभागी धावपटूंचे अहिल्यानगरमध्ये उत्साहाने स्वागत करण्यात आले.

पुणे येथे १५ जानेवारी २०२५ रोजी आयोजित 'सैन्य दिवस' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर ४०५ किमीच्या प्रवासाचा एक भाग असलेल्या या मॅरेथॉनचे आयोजन १९७१ च्या भारत–पाक युद्धातील भारतीय सैन्याच्या देदीप्यमान विजयाचे स्मरण करण्यासाठी आहे.

१९४९ मध्ये फील्ड मार्शल कोडंदेरा एम. करिअप्पा ज्या दिवशी भारतीय लष्कराचे पहिले भारतीय कमांडर–इन–चीफ बनले त्या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी १५ जानेवारी रोजी 'आर्मी डे' सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी हे आयोजन पुण्यात होणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. या दिवसाच्या पार्श्वभूमीवर ६ डिसेंबर रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुंबई येथून हिरवा झेंडा दाखवण्यात आलेली मॅरेथॉनचा नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर मार्गे जाईल. १६ डिसेंबर रोजी पुणे येथे समारोप होईल. धावपटूंच्या संघात १५ मुख्य धावकांचा समावेश आहे, ज्यात कर्नल मनदीप सिंग मान (निवृत्त) आणि कॅप्टन पूजा मेहरा (निवृत्त) यांसारखे उल्लेखनीय धावक सहभागी आहेत. सोबत शहरातील ज्येष्ठ दिग्गज, स्थानिक नागरिक आणि उत्तीर्ण झालेले एनसीसी कॅडेट्स आहेत. धावपटूंचे स्वागत करण्यासाठी आणि १९७१ च्या भारत–पाक युद्धातील शूर योद्ध्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी प्रत्येक ठिकाणी विशेष ' फ्लॅग इन' आणि ' 'फ्लॅग ऑफ' समारंभ आयोजित केले गेले आहेत. प्रत्येक शहरात, 'समर्थ भारत सक्षम सेना' या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

विजय दिवस अल्ट्रा मॅरेथॉनचे धावपटू नाशिकहून आव्हानात्मक प्रवास पूर्ण करून ८ डिसेंबर रोजी अहिल्यानगर येथे यशस्वीरीत्या पोहोचले. हिवरेबाजार येथून सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दखवून त्यांना पुढे मार्गस्थ करण्यात आले. मॅरेथॉनचा जिल्हास्तरीय समारोप अहिल्यानगर किल्ला परिसरात झाला.

अहिल्यानगर येथील मिलिटरी हॉस्पिटलचे ब्रिगेडियर वाणी सूर्यम यांनी धावपटूंचे स्वागत केले. आर्मर्ड कॉर्प्स सेंटर आणि मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटरच्या पाईप बँड्सच्या देशभक्तीपर संगीत मैफिलीने कार्यक्रम आणखी चैतन्यमय झाला. यावेळी वर्षा पंडित यांनी देशभक्तीपर गीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी ॲथलेटिक क्लब, अनुभवी मॅरेथॉनर्स, शाळकरी विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, वीर नारी आणि नागरिक उपस्थित होते.

हिवरेबाजार ते अहिल्यानगर किल्ल्यापर्यंतच्या संपूर्ण मार्गावर, नागरिक उत्साहाने मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले. मुख्य धावपटूंसोबत लहान मुले आणि तरुण धावपटू धावत होते. उत्साहवर्धक वातावरणात अहिल्यानगरने आपल्या क्रीडा संस्कृती आणि सशस्त्र दलांबद्दलचा आदराचे दर्शन घडविले. अहिल्यानगरची सशस्त्र दलाप्रती असणारी अभिमानाची भावना यानिमित्ताने प्रदर्शित झाली.

अहिल्यानगर येथील आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूलचे कमांडट मेजर जनरल विक्रम वर्मा यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापुरला फ्लॅगऑफ कार्यक्रमात सशस्त्र दलाचे जवान, त्यांचे कुटुंबीय, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि वीर नारी धावणार आहेत. याव्यतिरिक्त, अहिल्यानगर जिल्ह्यातील माजी सैनिकांना लाभ देण्यासाठी माजी सैनिक मेळा आणि लष्करी उपकरणे प्रदर्शनासह अनेक उपक्रमांचे आयोजन कॅव्हलरी टँक संग्रहालयात केले जाणार आहे.


# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकती आमचे आशिल १. दत्तु भास्कर पवार (मयत वारस ) १ अ. सनी दत्तु पवार १ ब. कृष्णा दत्तु पवार २. मच्छिंद्र भास्कर पवार ३. बाबा भास्कर पवार ४. गोकुळ भास्कर पवार ५. गोरख भास्कर पवार ( मयत वारस) ५ अ. नितीन गोरख पवार ५ब. सुवर्णा सुभाष गव्हाणे ६. मंगल बाबासाहेब लोणारे यांचे मालकी वहिवाटीची व आमचे अशिल यांचे ताब्यात व कब्जात असलेले मिळकत आहे. सदर खालील परिशिष्टात नमुद केलेले मिळकतीचे आमचे आशिल यांनी सदर जमिनीचे विकसन करण्याच्या हेतुने विजय पोपटलाल मेहेर यांचे बरोबर दि. ११/०८/२०२३ रोजी साठेखताचा दस्त लिहून दिले होते तसेच सदर साठेखतामधील ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे विजय पोपटलाल मेहेर यांनी वागणुक केलेली नाही. साठेखतामध्ये ठरल्याप्रमाणे उर्वरीत रक्कम आमचे अशील यांना दिलेली नाही. याउलट विजय पोपटलाल मेहेर यांनी आमचे अशिलाची उर्वरीत रक्कम बुडविण्याच्या दृष्टीने अनुप लालचंद्र हराळ यांचे बरोबर संगणमत करुन आमचे आशिल यांची फसवणुक करुन त्यांचे अज्ञानाचा गैरफायदा घेऊन बिनशेती कामा करीता महानगरपालिकेस रस्त्याचे क्षेत्राचा दस्त बनवुन देण्याचे आहे. असे भासवुन खोटा, बेकायदेशीर, मुखत्यारपत्राचे दस्त क्र. ९४८५/२०२४ दि. १५/१०/२०२४ रोजी आमचे आशिल यांच्यापासून सदरचा खोटा व बेकायदेशीर मुखत्यारपत्राचा दस्त लिहून नोंदवून घेतला आहे. त्या सोबत कोरे कागदावर डि. पी. रोड, ड्रेनेज लाईन, लाईटचे खांब, आमचे आशिल यांचे उर्वरीत क्षेत्र यास बिनशेती करणे कामी व नियोजित लेआऊट विकसन करावयाचे सांगुन सहया व अंगठे घेतले होते. सदर खोटे, चुकीचे व बेकायदेशीर मुखत्यारपत्राची माहिती नुकतीच आमचे अशिलांना झालेली आहे. सदर मुखत्यारपत्राचा दस्त क्र. ९४८५/२०२४ दि. १५/१०/२०२४ हा पहिल्या दिवसापासुन खोटा व बेकायदेशीर (VOID AB INITIO) असुन सदर खोटा व बेकादेशीर मुखत्यारपत्राचा दस्त आमचे आशिल यांचे वर बंधन कारक नाही. तरी आमचे आशिल यांनी कधीही अनुप लालचंद्र हराळ यांना त्यांचे मुखत्यार म्हणुन पसंत केले नाही व नेमलेले देखील नाही. परंतु अनुप लालचंद्र हराळ यांनी सदर बेकायदेशीर व खोटा मुखत्यारपत्राचा वापर करुन आमचे आशिल यांची परिशिष्ट मध्ये नमुद केलेल्या मिळकतीची वेळवेगळ्या लोकांना बेकायदेशीर खरेदीखत दस्त लिहून दिलेले आहे. तरी सदर बेकायदेशीर मुखत्यार पत्र व त्यावरुन झालेले बेकायदेशीर खरेदीखता विरुध्द योग्य ती दिवाणी व फौजदारी कार्यवाही करीत आहे. सदरचे मुखत्यारपत्र व खरेदीखत बेकायदेशीर असतांना देखील आमचे अशिल यांचे मालकीची मिळकत तिऱ्हाईत इसमास हस्तांतरीत करण्याचा व तिऱ्हाईत इसमांचे हक्क, हितसंबंध प्रस्तापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी सदरच्या जाहिर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदर परिशिष्टामध्ये वर्णन केलेले मिळकतीचे विजय पोपटलाल मेहेर, अनुप लालचंद्र हराळ व बेकायदेशीर खरेदीखत घेतलेले व्यक्ती यांचे बरोबर कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. कोणताही व्यवहार केल्यास तो आमच्या आशिलावर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर मिळकत खरेदी करणाऱ्या इसमास सदर मिळकतीचा क्लिअर व मार्केटेबल टायटल प्राप्त होणार नाही. तसेच आमचे अशिल सदर खरेदी घेणार व देणार यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसगत होऊ नये म्हणुन सदर जाहीर नोटीस आज रोजी प्रसिध्दीस दिली आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन –**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे मोरचुदनगर **येथील सर्व्हे नंबर ३९ / ३ मधील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.**

| प्लॉट नं. | क्षेत्र | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | २०१.९४ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नं. २ | सर्व्हे नंबर ४० | सर्व्हे नंबर ३९/२ पैकी |
| २ | २०२.२४ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नं. ३ | सर्व्हे नंबर ४० | प्लॉट नंबर १ |
| ३ | २०२.६२ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नं. ४ | सर्व्हे नंबर ४० | प्लॉट नंबर २ |
| ४ | २०१.८९ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नं. ५ | सर्व्हे नंबर ४० | प्लॉट नंबर ३ |
| ५ | २०२.३९ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नं. ६ | सर्व्हे नंबर ४० | प्लॉट नंबर ४ |
| ६ | २१०.७६ चौ.मी. | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | सर्व्हे नंबर ३९/४ पैकी | सर्व्हे नंबर ४० | प्लॉट नंबर ५ |
| ७ | २००.९७ चौ.मी. | प्लॉट नंबर ८ | सर्व्हे नंबर ३९/४ पैकी | १५.०० मी. रुंदीचा डिपी रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ८ | १७०.५५ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ ३८/२पैकी | सर्व्हे नंबर ३९/४ पैकी | प्लॉट नं. ७ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ९ | ३४०.६७ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ ३८/२पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता | १५.०० मी रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नंबर१० |
| १० | २६५.६९ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ ३८/२पैकी | प्लॉट नं. २ | १५.०० मी रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नंबर११ |
| ११ | २५२.६२ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ ३८/२पैकी | प्लॉट नं. १० | १५.०० मी रुंदीचा डिपी रस्ता | प्लॉट नंबर१२ |
| १२ | २२८.७२ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ ३८/२पैकी | प्लॉट नं. ११ | १५.०० मी रुंदीचा डिपी रस्ता | सर्व्हे नंबर ३९ / २ पैकी |
| या संपुर्ण प्लॉटस् बाबत. | | | | | |

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील **मौजे मोरचुदनगर येथील सर्व्हे नंबर ३७/२/१/३८/२ मधील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.**

| प्लॉट नं. | क्षेत्र | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| २ | १३०.४० चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ३ | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | प्लॉट नं. १ |
| ३ | १३०.६६ चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ४ | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | प्लॉट नं. २ |
| ४ | १३०.९२ चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ५ | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | प्लॉट नं. ३ |
| ५ | १३१.१७ चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ६ | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | प्लॉट नं.४ |
| ६ | १५७.९३ चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | प्लॉट नं. ५ |
| ७ | ११७.९५ चौ.मी. | ९.०० मी रुंदीचा रस्ता | सर्व्हे नंबर ३७/३ पैकी | सर्व्हे नंबर ३९/३ पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ८ | १७४.४७ चौ.मी. | प्लॉट नं. ९ | सर्व्हे नंबर ३७/३ पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| ९ | १८५.४४ चौ. मी. | सर्व्हे नंबर ३७/२/१ पैकी | सर्व्हे नंबर ३७/३ पैकी | प्लॉट नं. ८ | ९.०० मी रुंदीचा रस्ता |
| १० | १५७.६३ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/२ पैकी | ९.०० मी रुंदीचा रस्ता | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. ११ |
| ११ | १३२.०३ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/२ पैकी | प्लॉट नं. १० | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. १२ |
| १२ | १३२.०३ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/२ पैकी | प्लॉट नं.११ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. १३ |
| १३ | १३२.०३ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/२ पैकी | प्लॉट नं. १२ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. १४ |
| १४ | १३२.०३ चौ.मी. | सर्व्हे नंबर ३७/२/२ पैकी | प्लॉट नं. १३ | ९.०० मी रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. १५ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. ११/१२/२०२४
अहमदनगर.

**१. दत्तु भास्कर पवार (मयत वारस)**
**१ अ. सनी दत्तु पवार, १ब. कृष्णा दत्तु पवार**
**२. मच्छिंद्र भास्कर पवार, ३. बाबा भास्कर पवार**
**४. गोकुळ भास्कर पवार, ५.गोरख भास्कर पवार (मयत वारस)**
**५ अ. नितीन गोरख पवार ५ब. सुवर्णा सुभाष गव्हाणे**
**६. मंगल बाबासाहेब लोणारे**

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ,
डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८



## प्रकाशवाट

इथेच कुठे सापडतील
हरवलेल्या इवल्या आशा

इथेच कुठे गवसतील
लपलेल्या त्या सुप्त मनिषा

इथेच विरेल तनामनावर
साकळलेला अंधार दाट

अशाच पायऱ्या नेतील
असेल जिथे प्रकाशवाट

# कॅलिडोस्कोप

## रागाच्या भरात कर्मचाऱ्यांना काढले!



एका म्युझिक कंपनीच्या बॉसने रागाच्या भरात जवळपास ९० टक्के कर्मचाऱ्यांना काढून टाकलं आहे. सकाळी झालेली ऑफिसची मिटींग जॉईन केली नाही, त्यांना कामावरून काढून टाकण्यात येत आहे, असे बॉसने म्हटले आणि त्वरित सर्वांना टर्मिनेशन लेटर धाडले. अमेरिकातील कंपनीच्या बॉसने एकाच वेळी ९९ कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. ठरल्याप्रमाणे दिवसाच्या सुरुवातीला कंपनीच्या 'सीईओ'ने मिटींग घेतली. या मिटींगमध्ये जवळपास ९० टक्के कर्मचारी गैरहजर होते. ११० पैकी केवळ ११ जणांनी मिटींग जॉईन केली होती, याच गोष्टीचा बॉसला राग आला. या मिटींगला गैरहजर राहण्याचे धाडस केलेल्या कर्मचाऱ्यांना त्वरित नोकरीवरून काढून टाकण्यात आले. सकाळच्या मिटींगला उपस्थित न राहण्याची चांगलीच किंमत कर्मचाऱ्यांना मोजावी लागली.

चिडलेल्या 'सीईओ'ने सर्व गैरहजर कर्मचाऱ्यांना संदेश धाडले. तुम्ही कंपनीच्या नियमांचे उल्लंघन केले आणि तुमच्यात कामाप्रती अजिबात गंभीरता नाही, असा संदेश धाडत रागवलेल्या बॉसने ९९ कर्मचाऱ्यांना काढून टाकले. तुम्ही कंपनीचे मान्य केलेले करार पूर्ण करण्यात तुम्ही अयशस्वी ठरलात. कृपया कंपनीच्या मालकीचे सर्व साहित्य परत करा. सर्व खात्यांमधून साइन आउट करा आणि या ताबडतोब तुमचा राजीनामा सोपावा. मी तुम्हाला तुमचे जीवन अधिक चांगले करण्याची संधी दिली आहे, पुढे कठोर परिश्रम करा आणि यशस्वी बना. तुम्ही कंपनीला गांभीर्याने घेत नाहीत, हे तुम्ही मला दाखवून दिले आहे. आज सकाळी ११० लोकांपैकी फक्त ११ लोक बैठकीला उपस्थित होते. उपस्थित ११ सोडले तर बाकी सर्वांना नोकरीतून काढून टाकण्यात येत आहे, असेही तो म्हणाला.

बॉसने पाठवलेल्या टर्मिनेशन लेटरचा स्क्रीनशॉट एका इंटर्नने सोशल मीडियावर पोस्ट केले. यानंतर टीकेची एकच झोड उठली. या इंटर्नने म्हटले, की नोकरीवर रुजू झाल्यानंतर तासाभरातच त्याला काढून टाकण्यात आले.

## अजब प्रेम की गजब कथा



प्रेमाला वयाचं, धर्माचं, जातीचं, प्रांताचं बंधन नसतं असं म्हणतात. प्रेम कोणत्याही वयात होऊ शकतं. काही जोडपी याचं उदाहरण आहेत. मध्य प्रदेशातल्या झाबुआ प्रदेशात ७५ वर्षांचे भादू बुरिया आणि ७० वर्षांच्या भूरी मकवाना एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांची प्रेमकहाणी चर्चेचा विषय ठरली. प्रेमाची कबुली देण्यासाठी हे दोघं पोलीस स्थानकात दाखल झाले. घरच्यांकडून कोणताही विरोध होऊ नये यासाठी त्यांनी ही खबरदारी घेतली. काही दिवसांपासून ते एकत्र राहत होते. पण त्यांनी एकमेकांना काही अटी घातल्या होत्या. भादू यांनी दारू सोडावी असं भूरी यांना वाटत होतं. ते आदिवासी समाजातले आहेत. या समाजात लग्नाच्या वेळी वराला वधूमूल्य द्यावं लागतं. त्यानुसार भूरी यांच्या पतीने त्या काळात साडेतीन हजार रूपये दिले होते. पत्नी पतीला सोडून इतर कोणासोबत रहायला गेली तरी हे वधूमूल्य द्यावं लागतं. नंतर भादूही साडेतीन हजार रूपये द्यायला तयार झाला. पण आजच्या काळानुसार वाढलेलं वधूमूल्य देणं शक्य नसल्याचं त्यांचं म्हणणं होतं. आता या दोघांच्या प्रेमाचं पुढे काय होणार हे येणारा काळच ठरवेल. तिकडे उत्तर प्रदेशातल्या लखीमपुरखिरीमधलं एक जोडपं वयाच्या सत्तरीत एकमेकांच्या प्रेमात पडलं. आधी हे दोघं लिव्ह इन रिलेशनमध्ये रहात होते. नुकतेच ते विवाहबद्ध झाले. यावेळी दोघांचे कुटुंबीय उपस्थित होते. इटावामधल्या बुलाकीपुरा गावात ७० वर्षीय विष्णूदयाळ आणि ६६ वर्षीय रामबेटी विवाहबद्ध झाले. पाच वर्षांपूर्वी ते एकमेकांच्या प्रेमात पडले. एका लग्नात त्यांची ओळख झाली होती. पाच वर्षांनंतर त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. या लग्नालाही कुटुंबियांची उपस्थिती होती.



## मंदिर ड्रॅगनचं...



भारतात वेगवेगळ्या देवीदेवतांची मंदिरं आहेत. हिंदू धर्मात प्राणीमात्रांनाही देवस्वरूप मानण्यात आलं आहे. चीन, भूतानसारख्या बौद्ध धर्माचा पगडा असणाऱ्या देशांमध्ये ड्रॅगनला पवित्र मानतात. ड्रॅगन हा काल्पनिक प्राणी असल्याचं मानलं जातं. त्याच्याबाबत बऱ्याच आख्यायिका सांगितल्या जातात. हा प्राणी डायनासोरप्रमाणे विशालकाय असतो. त्याच्या तोंडातून आग बाहेर पडत असल्याचं चित्रांमधून आणि काही धार्मिक कथांमधून दाखवलं जातं. याच ड्रॅगनची काही मंदिरं जगभरात आहेत. भारतातही बौद्ध धर्माचा पगडा आहे. मणिपूर, सिक्कीम, लेह-लडाख या भागांमध्ये बौद्धधर्मियांची संख्या जास्त आहे. मणिपूरमधल्या पाखंगबामध्ये अशाच एका प्राण्याचं मंदिर आहे. या भागात त्याला देव मानलं जातं. त्याची पूजा केली जाते. हा प्राणी ड्रॅगनसारखाच दिसतो. बँकॉकमध्येही असंच एक मंदिर आहे. त्याची रचना आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे. या मंदिराच्या बाहेरच्या भागावर ड्रॅगनची प्रतिकृती आहे. ते स्थळ बँकॉकचं आकर्षणकेंद्र मानलं जातं. याठिकाणी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. तिथे भगवान बुद्धाची तेजस्वी आणि रेखीव मूर्ती आहे. थायलंडमधले लोक या स्थानाला पवित्र मानतात. सणावारी तिथे सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं.



## फरिदाबादमधील युवतींचा लग्न न करण्याचा निर्णय




काही लोक अन्न आणि पाण्याचा त्याग करतात, तर काही लोक आपल्या आवडत्या गोष्टींचा त्याग करून समाजात आदर्श निर्माण करतात. फरिदाबादमधील बारा मुली लोकांमध्ये चर्चेचा विषय बनल्या आहेत. या मुलींनी कधीही लग्न न करण्याची शपथ घेतली आहे. कारण या मुलींना व्हर्जिन राहून समाजासाठी योगदान द्यायचे आहे. हा कठोर निर्णय घेतल्याने समाजात खळबळ उडाली आहे. या तरुणींनी कधीही लग्न न करण्याची शपथ घेतली असून वैयक्तिक विकास आणि समाजसेवेवर भर देणे हे त्यामागचे कारण आहे. पारंपारिक वैवाहिक परिस्थितींपेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहून समाजासाठी योगदान देणे अधिक चांगले आणि महत्त्वाचे आहे, असा त्यांचा विश्वास आहे. या ग्रुपच्या सदस्या मीनू गोयल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले, की सर्व बारा मुली समाजाच्या भल्यासाठी काम करण्यासाठी स्वतःला झोकून देणार आहेत. फरिदाबादच्या स्थानिक मीडियाशी बोलताना, मी कधीच लग्न करणार नाही, असे मीनू म्हणाली. आम्ही बारा मुली एकत्र समाजासाठी काम करत आहोत. मीनू म्हणाली, समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देणे आणि स्वावलंबी होण्याइतके लग्न महत्त्वाचे नाही. वयाच्या ३० व्या वर्षी स्थायिक होणे महत्त्वाचे आहे. सामाजिक कार्यावर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर समाजाचे काही देणे घेणे खूप गरजेचे आहे, असे आम्ही मानतो.''

## 'रेड ॲण्ड व्हाईट' फॅमिली



या जगात कोणाला कशाचं वेड असेल काहीच सांगता येत नाही. बंगळुरूतल्या रिअल इस्टेट एजंट सवनराजला लाल आणि पांढऱ्या रंगाचं प्रचंड आकर्षण आणि कमालीचं वेड आहे. यामुळे त्याने घरातली प्रत्येक वस्तू या दोन रंगांमध्ये रंगवून घेतली आहे. त्याची गाडीही लाल-पांढऱ्या रंगाची आहे. इतकंच नव्हे तर त्याचे कपडेही याच दोन रंगांमधील असतात. सवनराजचं सगळं विश्व या दोन रंगांमध्ये सामावलं आहे असंही म्हणता येईल. त्याने शक्य तितक्या वस्तू या दोन रंगांमध्ये रंगवल्या आहेत. त्याच्या कुटुंबियांकडील प्रत्येक वाहनही लाल आणि पांढऱ्या रंगाचं आहे. त्याच्या या वेडामुळेच कुटुंबातला प्रत्येक सदस्य लाल आणि पांढऱ्या रंगाचे कपडे घालतो. त्यांच्या हॉलमध्ये शिरल्यावर प्रत्येक वस्तू लाल आणि पांढऱ्या रंगाची दिसते. फक्त टीव्ही या रंगात रंगवलेला नाही. खरंतर त्याच त्याच रंगाचे कपडे आणि इतर वस्तू पाहून आपल्याला कंटाळा येईल. पण सवनराजला या रंगांचा कधीही कंटाळा येत नाही. त्याचे हेडफोन्स, घड्याळ, मोबाईलचं कव्हर, अंगठी, ब्रेसलेट, चेन हे सगळं याच दोन रंगांमध्ये सजलेलं आहे. इतंकच कशाला टूथब्रश, टूथपेस्टही याच रंगाचे आहेत. इतकं पराकोटीचं वेड पाहून कोणालाही आश्चर्यच वाटेल. आता तर त्यांच्या कुटुंबाला 'रेड ॲण्ड व्हाईट फॅमिली' म्हणूनच ओळखलं जातं.

## बिअर विविध रंगाच्या बाटल्यांमध्येच का?




अल्कोहोल हे आरोग्यासाठी हानिकारकच आहे. विविध ब्रँडच्या बिअर वेगवेगळ्या रंगाच्या बाटल्यांमध्ये येतात; पण असे का, तर या वेगवेगळ्या रंगाच्या बाटल्या सूर्याच्या किरणांवर वेगवेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देतात. याचा थेट परिणाम बिअरच्या चवीवर होतो. बिअरच्या बाटल्यांचा रंग केवळ सौंदर्य किंवा मार्केटिंगसाठी नसतो. तर याचा परिणाम बिअरच्या चव आणि दर्जावरही होतो. या विविध रंगांच्या बाटल्या बिअर ताजे ठेवण्यास मदत करतात. काचेच्या बाटल्यांमध्ये बिअरचे पॅकेजिंग १९ व्या शतकातील आहे. याचे कारण म्हणजे काचेच्या बाटल्यांमध्ये बिअर बराच काळ ताजी राहते आणि ही एक स्वस्त आणि उत्कृष्ट पद्धत आहे. काही काळानंतर हे स्पष्ट झाले की, पारदर्शी काचेच्या बाटल्यांमध्ये बिअर ठेवणे योग्य नाही. कारण या बिअरच्या बाटल्या सूर्यप्रकाशात येतात, तेव्हा त्यांच्या चव आणि सुगंधात बदल होतो, जो पिण्यास आनंददायी नाही. या घटनेला लाइटस्ट्रक म्हणतात. सूर्याचे अतिनील किरण बिअरवर आदळतात आणि त्यातील घटकांसह विशेषतः हॉप्सवर प्रतिक्रिया देतात तेव्हा असे होते. हॉप्समध्ये आयसोह्युमुलोन असतात, जे त्याचा वास बदलू शकतात. ही समस्या टाळण्यासाठी कंपन्यांनी ब्राऊन म्हणजेच तपकिरी बिअरच्या बाटल्यांचा वापर सुरू केला.

या बाटल्या सूर्याच्या यू.व्ही. किरणांपासून बीअरचे संरक्षण करतात. हे बिअरमध्ये उपस्थित असलेल्या संवेदनशील घटकांसह कोणत्याही केमिकल रिॲक्शनला प्रतिबंधित करून, प्रकाशाला आत जाऊ देत नाही. म्हणून, तपकिरी बाटल्या बिअची शुद्धता टिकवून ठेवतात. असे म्हणतात, तपकिरी बाटल्या सामान्यतः वापरात आल्या, तेव्हा कंपन्यांना त्यांच्या उत्पादनाचे सूर्यप्रकाश आणि इतर एक्सपोजरपासून संरक्षण करायचे होते.

## लग्नाची अनोखी भेट

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातला अविस्मरणीय प्रसंग असतो. तो संस्मरणीय व्हावा यासाठी वधू-वर बरंच काही करत असतात. कोणी डेस्टिनेशन वेडिंग करतं तर कोणी अनोख्या संकल्पनांचा अवलंब करतं. काही जणांना यानिमित्त आयुष्यभर लक्षात राहील अशी भेट मिळते. इंग्लंडमधल्या डेनी माउंटफोर्ड आणि कार्ल या दाम्पत्याला लग्नाच्या दिवशी अशीच भेट मिळाली. ऐकून आश्चर्य वाटेल पण डेनीने याच दिवशी बाळाला जन्म दिला. लग्नाच्याच दिवशी त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला. यामुळे त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. लग्नाच्याच दिवशी आई-बाबा होणं ही अनोखी घटना मानली पाहिजे. इंग्लंडमधल्या वेस्ट मिडलँडमध्ये राहणाऱ्या १९ वर्षीय डेनी आणि १८ वर्षीय कार्ल यांचं गेल्या १८ डिसेंबरला लग्न होतं. त्यावेळी डेनी गरोदर होती. या दोघांचे काही वर्षांपासून प्रेमसंबंध होते. या नात्याला नाव देण्यासाठी त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. ठरल्याप्रमाणे लग्नाचे विधी संपन्न झाल्यानंतर स्वागत समारंभ सुरू असतानाच डेनीला प्रसववेदना सुरू झाल्या. त्यानंतर तातडीने तिला दवाखान्यात नेण्यात आलं. इथे तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. या काळात लग्नासाठी आलेले पाहुणे पार्टी करत होते. त्यांनाही ही गोड बातमी मिळाली. यामुळे सर्वांचा आनंद द्विगुणीत झाला. खरंतर डेनीला प्रसूतीसाठी जानेवारीतली तारीख देण्यात आली होती. त्यामुळे या दोघांनी डिसेंबरमध्ये लग्नाचा निर्णय घेतला. पण वेळेआधीच प्रसववेदना सुरू झाल्या आणि लग्नाच्याच दिवशी बाळाचा जन्म होण्याची अनोखी घटना घडली.





## नवं वर्षाचं असंही स्वागत

जगभरात नववर्षाचं उत्साह आणि आनंदात स्वागत केलं जातं. कुठे आकाशात आतषबाजी करण्यात येते तर कुठे डीजेचा दणदणाट गाजतो. नववर्षाच्या स्वागताची धूम असताना काही ठिकाणी नववर्षाच्या स्वागताच्या अनोख्या प्रथा परंपरा पहायला मिळतात. त्याविषयी...

* इटलीमध्ये 'आउट वुईथ द गोल्ड' ही म्हण प्रचलित आहे. वस्तू बाहेर फेकण्याइतकं चांगलं काहीही नाही असा त्याचा अर्थ. यासाठी नववर्षाच्या मुहूर्ताची निवड करण्यात आली आहे. नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला घराच्या खिडकीतून सामान बाहेर फेकणं शुभ समजलं जातं. हे सामान म्हणजे टीव्ही, टोस्टर, पॅन असं काहीही असू शकतं. यामुळे नव्या वर्षात नव्या वस्तूंसाठी जागा होते, असं हे लोक समजतात.


* एस्टोनियातले लोक खाण्याचे सात, नऊ किंवा बारा प्रकारचे पदार्थ कपाटात बंद करून ठेवतात. यामुळे नवं वर्ष लाभदायी ठरतं, असं इथले लोक मानतात. ३१ डिसेंबरच्या रात्री पूर्वजांचे आत्मे जेवायला येतात, अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच त्यांच्यासाठी कपाटात पदार्थ ठेवले जातात.

* ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री ब्राझीलमधले लोक पांढऱ्या कपड्यांमध्ये समुद्रकिनारी जातात आणि समुद्रात डुंबतात. यामुळे संपूर्ण वर्ष आनंददायी जातं, असं इथले लोक मानतात.

* डेन्मार्कमधले लोक वर्षभर फुटकी भांडी जपून ठेवतात आणि नववर्षाच्या पूर्वसंध्येला शेजाऱ्यांच्या घरासमोर टाकतात. यामुळे घरात सौभाग्य नांदतं अशी त्यांची श्रद्धा आहे.

## रंग बदलणारे केसाळ मासे

तुम्ही कधी केसाळ मासा पाहिला आहे का? शेजारच्या फोटोत दिसणारी आकृती म्हणजे असाच एक मासा आहे. 'हेयरी फ्रॉगफिश' असं त्याचं नाव आहे. समुद्रात ३३० फुट खोलवर त्याचं वास्तव्य आढळतं. तळाशी असणारी माती, दगड आणि वनस्पतींमध्ये तो लपून बसतो. इंडोनेशियातल्या इंडो-पॅसिफिक समुद्रात या जलचरांच्या अनेक प्रजाती पहायला मिळतात. हेयरी फ्रॉगफिशची लांबी एक ते पंधरा इंचांपर्यंत असते. त्यांच्या शरीरावर केसांप्रमाणे दिसणारे काटे असतात. त्यांना 'स्पिन्यूल' म्हटलं जातं. हे जलचर रंगही बदलतात. त्यामुळे ते पटकन ओळखता येत नाहीत. गरज असेल तरच हे मासे पोहतात अन्यथा निवांत पडून राहतात. त्यांच्या काही प्रजाती पाण्याने शरीर फुगवू शकतात. असं करून शत्रूला चकवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हा मासा पिवळा, लाल, काळा, धुरकट आणि हिरवा असे विविध रंग धारण करू शकतो. ते आपल्याच प्रजातीच्या माश्यांची शिकारही करतात. सध्या माश्यांच्या या जातीवर अधिक संशोधन सुरू आहे.



# बांगलादेशींना कोणी आश्रय दिल्यास त्यांची अजिबात गय करणार नाही

## हिंदूराष्ट्र सेना शहर प्रमुख निखिल धंगेकर यांचा इशारा



नगर – एकीकडे बांगलादेश येथे हिंदूंवर प्रचंड अत्याचार सुरू आहेत तर दुसरीकडे भारतात इतकेच नव्हे तर महाराष्ट्रात आणि आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक बांगलादेशी अनधिकृतपणे वास्तव्य करत आहेत. या पुढील काळात नगर शहरासह जिल्ह्यात बांगलादेशींना कोणी आश्रय देताना आढळून आल्यास त्यांची आजीबात गय करणार नाही. त्यांचा योग्य पद्धतीने समाचार घेतला जाईल असा इशारा हिंदूराष्ट्र सेना शहर प्रमुख निखिल धंगेकर यांनी दिला आहे. धंगेकर यांनी पत्रकात म्हंटले आहे की, गेल्या महिनाभरापासून शेजारील देश बांगलादेश येथे हिंदूंवर प्रचंड अत्याचार सुरू आहेत हिंदू बांधवांना मारहाण घरातून बाहेर काढणे, कोणताही गुन्हा नसताना जेलमध्ये डांबणे, मृत्यू घडून येईपर्यंत हिंदूंना मारहाण करणे, असे प्रकार सर्रासपणे होत आहेत. त्या देशातून हिंदूंचे समूळ उच्चाटन करण्याचा चंगच जणू बांगलादेशी मुस्लिमांनी बांधला आहे. भारतामध्येही बांगलादेशी नागरिकांची संख्या प्रचंड मोठी आहे. त्यातही ते बेकायदेशीर रित्या भारतामध्ये राहत आहेत. त्यांच्याकडे भारतात राहण्याचा कोणताही परवाना, नागरिकत्व वगैरे नाही. तथापि आजपर्यंत त्यांना राजकीय स्वार्थापोटी भारतामध्ये राहण्याची मुभा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या देण्यात आली होती.

### बांगलादेशींमुळेच गुन्हेगारीत मोठी वाढ


हिंदूंची हिच भूतदया आता हिंदूंच्याच मुळावर उठली आहे. बेकायदा भारतात राहणारे बांगलादेशी सुरक्षित आणि सुखात आहेत. मात्र आता त्यांना त्यांच्या मायदेशी धाडण्याची वेळ आलेली आहे. त्यातच भारतामध्ये वेगवेगळ्या प्रकारची गुन्हेगारी वाढत असून त्यामध्ये या मंडळींचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. परंतु ऑन रेकॉर्ड त्यांचा उल्लेख नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचताना पोलीस प्रशासनाला अनेक अडचणी येत आहेत. विशेषतः औद्योगिक वसाहती आणि मुस्लिम बहुल वस्त्यांच्या परिसरांमध्ये या लोकांची संख्या मोठी आहे. अशा सर्वांची शोध मोहीम सुरू करण्यात यावी, त्यांना तत्काळ त्यांच्या मायदेशी हुसकावून लावण्याची व्यवस्था शासन व प्रशासनाने करावी.

आम्ही आमच्या पद्धतीने अशा मंडळींचा शोध घेत आहोत. भारताने पाळलेले हे अस्तनीतील साप आता ठेचण्याची गरज व अपरिहार्यता निर्माण झालेली आहे.प्रशासनाने त्यांच्या पद्धतीने शोध घेऊन या विखारी मंडळींचा तत्काळ बंदोबस्त करावा. या सोबतच प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून आम्हीही त्यांच्या शोधासाठी प्रयत्नशील आहोतच. अशी मंडळी कुठे कुणाला आढळल्यास, संशय असल्यास आमच्याशी किंवा पोलिसांशी संपर्क साधून त्यांची माहिती द्यावी, असे आवाहन आम्ही नागरिकांना करीत आहोत.

### सकल हिंदू समाज व हिंदूराष्ट्र सेना राबविणार बांगलादेशी शोधमोहीम

ज्यांनी अशा मंडळींना स्वतःच्या जागा भाडोत्री दिल्या आहेत, अशा घरमालकांनी त्यांना तत्काळ घराबाहेर काढून पोलिसांना याबाबत माहिती द्यावी. अन्यथा त्यांना आश्रय दिल्याप्रकरणी संबंधित घरमालकांवरही गुन्हे दाखल करावेत व कायदेशीर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे. आम्ही आमच्या पद्धतीने शोध घेणार आहोतच. अशावेळी बांगलादेशींसह त्यांना आश्रय देणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल व याची संपूर्ण जबाबदारी त्या संबंधितांची राहील, याची नोंद जागामालकांनी घ्यावी. आजपासून सकल हिंदू समाज व हिंदूराष्ट्र सेना हे अभियान नगर शहर व जिल्ह्यात राबवत आहे. याची माहिती अशा मंडळींना आश्रय् देणाऱ्यांना व्हावी व त्यांनी बांगलादेशींना घराबाहेर काढून पोलिसांना त्यांच्या बाबत माहिती द्यावी, यासाठी हे निवेदन प्रसिद्धीस देत आहोत. राष्ट्रहिताच्या या कार्यात प्रत्येकाने जागरूक राहून सहभाग नोंदवावा, असे आवाहन निखिल धंगेकर यांनी केले आहे.

# महावितरणच्या पेपरलेस-फेसलेस प्रणालीमुळे केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेला खीळ



नगर – पंतप्रधान सूर्य घरच्या योजनेला महावितरणच्या पेपरलेस फेसलेस योजनेतील तांत्रिक अडचणींमुळे खीळ बसली असून यामुळे महाराष्ट्रातील अनेक ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे. ग्राहकांच्या नाराजीचा फटका सौर योजनेतील व्यावसायिकांना देखील बसत असून दोन्ही पोर्टल प्रणालीमध्ये होणारे वारंवार बदल, हेच नाराजीचे मूळ कारण असल्याचे ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जीचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी सांगितले.

ऑक्टोबरमध्ये महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून संपूर्ण प्रक्रिया पेपरलेस आणि फेसलेस होणार याकरिता योग्य ते बदल करून यंत्रणा कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले, यासाठी तारीख निश्चित करणे आवश्यक होते परंतु तसे झाल्याचे दिसले नाही. पूर्वसुचना न देता महावितरणने ही प्रक्रिया सुरू केल्याने समन्वयाचा अभाव आला आहे. ज्या ग्राहकांचे मीटर बसणार होते त्यांना या योजनेचा फटका बसला. या प्रक्रियेत सुरूवातीला १६ कागदपत्रे अपलोड करावयास सांगितली, त्यानंतर त्याची संख्या ६ वर आली परंतु, अनेक ग्राहकांची नावे दिसत नसल्याने कागदपत्रे अपलोड करावयाची कुठे हा प्रश्न व्यावसायिकांसमोर पडला आहे. त्याचसोबत सौर मॉड्युलच्या भारतीय बनावटीचे (dcr certificate) असल्याचे प्रमाणपत्रातील क्रमांक अपलोड करताना अडचणी येत आहे.

महावितरणने पंतप्रधान सूर्य घरच्या ग्राहकांसाठी स्मार्ट नेट मीटर आणले असून ते बसविण्याकरिता व्यावसायिकाने अपलोड केलेली कागदपत्रे, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ते अप्रूव केल्यानंतर मीटर बसविण्याकरिता रिलीज पत्र आपोआप येते. परंतु अद्यापही बरेच ठिकाणी या प्रक्रिया लांबतात. तसेच पुढील प्रक्रिया वेळेत न झाल्याने या सर्वांचा फटका सूर्य घर योजनेला आणि ग्राहकांना बसत आहे. या व्यतिरिक्त प्रलंबित आणि मागे झालेली अनेक प्रकरणेबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्राहकांना सरासरी बिले प्राप्त होत आहेत. याबद्दल ग्राहक नाराज आहेत. ही नाराजी व्यवसायिकांना सहन करावी लागत आहे. जिल्ह्यात २५ हजाराचे टार्गेट असताना आतापर्यंत वर्षभरात केवळ १४०० सिस्टम बसवले गेले आहेत.

महावितरणने तसेच पीएम सूर्यघरने पोर्टलमध्ये वारंवार बदल करू नयेत, यासाठी सौर व्यावसायिक आग्रही आहेत. नवीन सरकारमधील ऊर्जा मंत्रालयाने यावर त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी संघटना करीत असल्याचे अमित काळे यांनी सांगितले.

# बांगलादेशातील अत्याचार थांबवावेत अन्यथा हिंदू समाज आक्रमक होईल

## घटना काळीमा फासणारी : तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज



बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात नगर तालुका व चिचोंडी पाटील येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने चिचोंडी पाटील येथे गणपती मंदिरापासून ग्राम प्रदक्षिणा पूर्ण करून हिंदू समाजाने निषेध नोंदविला.

नगर – बांगलादेशातील हिंदू बांधवांवर भगिनींवर तसेच बालकांवर होणारे अत्याचार या घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत. यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. बांगलादेशातील हिंदू हे आमचे बांधव आहेत. समाजकंटकांनी जे अमानवीय कृत्य केले आहे. याचा सर्व हिंदू समाज निषेध करीत आहे. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार त्वरित थांबवावेत अन्यथा हिंदू समाज आक्रमक होईल, असे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांनी केले आहे.

बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात नगर तालुका व चिचोंडी पाटील येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने चिचोंडी पाटील येथे गणपती मंदिरापासून ग्राम प्रदक्षिणा पूर्ण करून हिंदू समाजाने निषेध नोंदविला आहे. याप्रसंगी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, ह.भ.प. नरोडे महाराज, ह.भ.प. काळे महाराज, ह.भ.प. स्वप्निल महाराज पवार, ह.भ.प. उज्वलाताई ठोंबरे, रा.स्व.संघाचे सचिन राऊत आदींसह नगर तालुका व चिचोंडी पाटील पंचक्रोशीतील विविध हिंदुत्ववादी संघटना व सकल हिंदू समाज उपस्थित होता.

याप्रसंगी सचिन राऊत म्हणाले, ज्या देशानी आपल्याला वंदे मातरम दिले त्याच देशात आज हिंदूंवर अत्याचार होत आहेत. आपल्या घरातील एक ना एक व्यक्ती हा कुठल्या ना कुठल्या हिंदू संघटनेला जोडलेला असावा.असे आवाहन त्यांनी हिंदू समाजाला केले.

हभप काळे महाराजांनी गोमातेला राजमातेचा दर्जा मिळाला आहे. देशातील गो हत्या थांबवावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

स्वामी रामानंदजी पुरी महाराज (सालेवडगाव) यांनी विश्वशांतीची प्रार्थना केली. नरोडे महाराज यांनी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.

सरकारने तात्काळ कार्यवाही बांगलादेशमधील हिंदूना संरक्षण द्यावे. इस्कॉनचे संन्यासी चिन्मय कृष्णादास यांची सुटका करावी. वक्फ बोर्ड कायदा कायमचा रद्द करावा. यासाठी प्रयत्न करावेत.

गोहत्या थांबवावी वरील मागण्या पूर्ण नाही झाल्यास सकल हिंदू समाजाच्या आक्रोशाला व रोषाला सरकारला सामोरे जावे लागेल, असा इशारा सकल हिंदू समाजाच्यावतीने देण्यात आला आहे.

# नगर शहरामध्ये १३ ते १५ डिसेंबर दरम्यान गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशन

## पुण्यातील मोहिनी ब्रॅण्डचे आकर्षक कलेक्शन प्रथमच नगरला



नगर – नगरमध्ये हॉटेल आयरिस येथे गहना डायमंड व गोल्ड ज्वेलरीचे एक्झिबिशनला आयोजित करण्यात आले आहे. १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत सकाळी १०.३० ते रात्री ८ यावेळेत सदर विक्री प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. पुणे पिंपरी चिंचवड येथील मोहिनी ज्वेलर्स ब्रॅण्डचे खास कलेक्शन याठिकाणी असणार आहे. मोहिनी ब्रॅण्ड प्रथमच नगर शहरात आपले खास कलेक्शन सादर करणार आहे.

गहनाचे मन खेरगांवकर यांनी सांगितले की, राज्यातील तसेच देशातील नामांकित ब्रॅण्डचे दागिन्यांचे खास कलेक्शन नगरमध्येच उपलब्ध करून देण्यासाठी गहनाच्यावतीने नगर शहरात वेळोवेळी एक्झिबिशन घेण्यात येते. यंदा दिलिप सोनिगरा यांचा प्रतिष्ठित मोहिनी ब्रॅण्ड आपले खास दागिने प्रदर्शित करणार आहे. ब्रायडल ज्वेलरीची मोठी आणि आकर्षक रेंज यात असणार आहे. प्राचीन भारतीय कलाकुसरीची राजेशाही ंटिक ज्वेलरीची प्रत्येकालाच आवड असते.अशा खास कलाकुसरीच्या ज्वेलरीचे कलेक्शनही प्रदर्शनात असेल. राजस्थानी कारागीरांची खासियत असलेली जडाऊ ज्वेलरी, पोलकी ज्वेलरी नगरकरांना खरेदीचा सोनेरी आनंद देणारी ठरेल.

प्रदर्शन कालावधीत मन खेरगांवकर अभ्यासपूर्ण ज्योतिष शास्त्राचाही लाभ मिळणार आहे. वेदीक ज्योतिष, वास्तू शास्त्र, विवाह योग, व्यवसाय वृद्धी, चांगले करियर, आरोग्य समस्या, मुलांचे जन्म, कोर्ट मॅटर अशा अनेक समस्यांची ज्योतिष शास्त्रानुसार उत्तरे खेरगांवकर देतात. यासाठी संपर्क: ९१३७९८५३७९. नगरकरांनी या खास प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# रोलर स्केटिंग स्पर्धेत रावी देशपांडे हिचे यश



नगर – जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशनशी संलग्न असलेल्या टीम एम अकादमीतर्फे आयोजित केलेल्या रोलर स्केटिंग चॅम्पिअनशिप स्पर्धेत ५ वर्षाखालील वयोगटात कु. रावी दिनेश देशपांडे हिने यश संपादन केले आहे.

भिंगार येथील टीम एम अकादमीच्या मैदानावर ८ डिसेंबर रोजी ही स्पर्धा आयोजित केलेली होती ज्यामध्ये ५, ९, ११, १४ व १७ वर्षाखालील वयोगटातील विविध स्पर्धाकांनी सहभाग नोंदवला.

प्रत्येक गटात पहिल्या तीन विजेत्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत कु. रावी दिनेश देशपांडे हिने प्रशिक्षक प्रमोद डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली कांस्य पदक संपादन केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



अहिल्यानगर जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशन संलग्न ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सहभागी झालेले खेळाडू.

# भिंगारला रंगली रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा

## खेळाडूंनी दाखवले वेग आणि कौशल्याचे कसब

नगर – अहिल्यानगर जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशन संलग्न ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धा उत्साहात पार पडली. अकॅडमीच्या मैदानावर रंगलेल्या स्पर्धेत खेळाडूंनी सहभाग नोंदवला. वेग आणि कौशल्याचे कसब खेळाडूंनी दाखवली. वाऱ्याच्या गतीने धावणाऱ्या खेळाडूंनी रोमांचक पध्दतीने खेळाचे प्रदर्शन केले.

रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी प्रियदर्शनी पब्लिक स्कूलचे संचालक बाळासाहेब खोमणे, प्रणिता मेंडसूरे, महेश झोडगे, आसिफ शेख, प्रशिक्षक प्रशांत पाटोळे, जयेश आनंदकर, अमर लोंढे, संजू वाखर आदींसह खेळाडू व पालक उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजक शुभम कर्पे व प्रमोद डोंगरे यांनी पाहुण्यांचे स्वागत करुन स्पर्धेची माहिती दिली. बाळासाहेब खोमणे यांनी जीवनात प्रत्येक स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी खेळाडूंनी ठेवावी. खेळाडूवृत्तीने जीवनाचा खरा आनंद लुटता येत असल्याचे सांगून, विद्यार्थ्यांना मैदानी खेळ खेळण्याचे त्यांनी आवाहन केले. उपस्थित पाहुण्यांनी खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

ही स्पर्धा ५, ९, ११ व १४ वर्षा आतील व १४ वर्षा वरील खेळाडूंसाठी बिगनर, क्वाड्स, व्यावसायिक इनलाइन व फॅन्सी इनलाइन या प्रकारात पार पडली. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना पदके उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आली. तर सहभागी खेळाडूंना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील दोनशेपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

# १३ डिसेंबर रोजी कॉम्प्युटरद्वारे मोफत तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

नगर – जामखेड येथे स्व. सुंदरबाई कन्हैय्यालाल शिंगवी सेवाभावी प्रतिष्ठान आदर्शऋषीजी महाराजसाब यांच्या आशिर्वादाने व आनंदऋषीजी नेत्रालय, व शिंगवी चष्माधर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रवादी अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या व स्व. सुदराबाई ट्रस्टचे अध्यक्ष अशोक शिंगवी यांच्या वाढदिवसा निमित्त १३ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शिबीराचे अत्यंत अल्प दरात लेन्स टाकून शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया सह, कॉर्नीया, टेरिझम, रेटिना व नेत्ररोग या सर्व तपासण्या व शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांचे मोतीबिंदू, तिरळेपणा, पापणी लावणे या देखील शस्त्रक्रिया महात्मा जन आरोग्ययोजनाद्वारे मोफत केले जातील. मधुमेह रुग्णांसाठी मागील पडदा (रेटिना) याचीही शस्त्रक्रिया केली जाईल.

शिबीरातील उपलब्ध सुविधा मोफत ऑप्रेशन करुन अल्प दरात लेन्स बसविण्यात येतील. मोफत औषधोपचार, काळा चष्मा, जामखेड ते अहमदनगर येण्या-जाण्याची मोफत सोय, राहण्याची व जेवणाची सोय, आधारकार्ड किंवा रेशनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स, चालु औषधे व गोळ्या बरोबर आणाव्यात असे ट्रस्टचे सचिव अभय शिंगवी यांनी सांगितले.

ऑपरेशन झाल्यानंतर सव्वा महिना पर्यंत मोफत तपासणी केली जाईल.

गरजूंनी याचा लाभ घ्यावा. नांव नोंदणी आवश्यक आहे. नांव नोंदणी शिंगवी चष्माघर, जुना कापड बाजार, महाप्रभुजी मार्ग, हॉटेल देवेंद्र बिल्डींग, अहमदनगर मो.नं.९२८४०५८८५९ व शिंगवी चष्माघर, मेनरोड, जामखेड फो. नं.९२२६१२२०६१ येथे करावी असे शिंगवी चष्मा घरचे संचालक अजित शिंगवी यांनी सांगितले.

# स्नेहालयतर्फे १५ डिसेंबरला सामुदायिक विवाह सोहळा

नगर – एच.आय.व्ही. सह जीवन जगणाऱ्या संसर्गीतांचे आपले जीवन आशय संपन्न करण्यासाठी इतर दुर्धर आजारी रुग्णांचे जीवन विकसित करण्याची महत्वपूर्ण प्रेरणा देणे, हा स्नेहालयाच्या कामाचा एक प्रमुख भाग आहे. एच.आय.व्ही. सह जीवन जगणाऱ्या संसर्गीतांना नवी उमेद – दिशा –आशा मिळावी यासाठी स्नेहालय संस्थेने सन २०१४ पासून दरवर्षी २ डिसेंबरला राज्यस्तरीय वधू – वर परिचय मेळाव्याचे आयोजन करीत आहे. मागील दहा वर्षात ५५०० पेक्षा जास्त वधू –वरांनी आपली नावनोंदणी केली आहे. मागील दहा वर्षात ८३ जोडप्यांनी आपले सहजीवन निवडले. दरवर्षी १५ डिसेंबरला सामुदायिक विवाहद्वारे या ८३ जोडप्यांचे लग्न स्नेहालयाने लावून दिले आहे. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे यातील १८ जोडप्यांना जी मुले झाली आहेत ती सर्व बालकांचे एच.आय. व्ही. चे अहवाल (रिपोर्ट) नकारात्मक (निगेटिव्ह) आले आहेत. राज्यस्तरीय वधू-वर परिचयात निवड झालेल्या जोडीदारांचे १५ डिसेंबर रोजी सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती स्नेहाधार प्रकल्पाच्या प्रमुख विद्या घोरपडे यांनी सांगितले.

# महात्मा ज्योतीबा फुले फेलोशिप नॅशनल अ‍ॅवॉर्डने अहिल्यानगर येथील पैं. नाना डोंगरे सन्मानित



नगर – सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल पैं. नाना डोंगरे यांना दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीच्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले फेलोशिप नॅशनल अ‍ॅवॉर्डने सन्मानित करण्यात आले. डोंगरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना दुसऱ्यांदा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

४० व्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात सदर पुरस्काराचे वितरण करण्यात आले. निमगाव वाघा (ता. नगर) येथील नाना डोंगरे शाळेत कार्यरत असून, स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. ग्रामीण भागात वृक्षरोपण, बीजरोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध कार्यक्रम घेऊन त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी मोठी जनजागृती केली आहे. ग्रामीण भागात काव्य संमेलनाच्या माध्यमातून नवोदित कवींना प्रोत्साहन देण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. तर वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लावण्याचे कार्य ते करत आहे. डोंगरे यांनी जिल्हा पातळीवर स्त्री जन्माचे स्वागत, वृक्षरोपण, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जागृती मोहिम व रक्तदान शिबीर व्यापक स्वरुपात राबविले. व्यसनमुक्तीचे उपक्रम राबवून युवकांना दिशा देण्याचे कार्य सुरु आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, काव्य व युवा संमेलन घेऊन समाजाला दिशा देण्याचे कार्य ते करत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

